अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## कोर्टात केस केल्याच्या कारणावरून विवाहितेस नांदविण्यास नकार

### सात जणांविरोधात गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

घरासमोर येऊन माझ्या विरोधात कोर्टात केस का केली ? आता तर तुला नांदवणारच नाही. असे म्हणून पत्नीस शिवीगाळ व दमदाटी केल्याप्रकरणी पतीसह ७ जणांच्या विरोधात जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी सौंदर्या शाम धर्मकांबळे (रा.लोहिया नगर,पुणे सध्या-न्यू पाच्छापेठ दत्तनगर सोलापूर) यांना पतीने तुझ्या आई-वडिलांनी लग्नात नीट मानपान केला नाही.हुंडा कमी दिला.दुसरे घर घेण्यासाठी माहेरून दहा लाख रुपये घेऊन ये म्हणून मानसिक व शारीरिक छळ केला.

तसेच दि.३ जुलै रोजी संशयित आरोपी याने फिर्यादीच्या माहेरी सोलापुरातील दत्तनगर येथे येऊन कोर्टात केस का केली? तुला तर आता नांदवणारच नाही. असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केली. याप्रकरणी पती शाम धर्मकांबळे, दीर साई किशोर महावीर धर्मकांबळे, चुलत सासू पद्मा धर्मकांबळे, नंणद ममता गणेश धर्मकांबळे, आत्या अनुराधा राहुलोलू, शकुंतला मेटकरी व नरसुबाई या सात जणांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला असून, अधिक तपास पोलीस नाईक मस्के हे करीत आहेत.


www.surajyadigital.com | शुक्रवार दि. ११ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ४५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# ईडीचे काम आली तक्रार; करा अटक
# पुढे काय? ना सुनावणी, ना निकाल

✔ सुराज्य/सोलापूर

**आत्तापर्यंत माहिती नसणारे 'ईडी' आणि 'पीएमएलए' असे शब्द गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रासह देशाला माहिती झाले. 'ईडी' ही एक तपास यंत्रणा असून 'पीएमएलए' हे कायद्याद्वारे स्थापित विशेष न्यायालय आहे. 'ईडी'ने केलेल्या तपासावर आधारित खटले 'पीएमएलए' कोर्टात चालतात. पण स्थापना झाल्यापासून आत्तापर्यंत या कोर्टात ना कुठल्या खटल्याची सुनावणी पूर्ण झाली ना त्या सुनावणीवर आधारित निकाल लागला. मग 'ईडी'चे काम काय? तर आली तक्रार की करा अटक आणि टाका तुरुंगात. यावर खुद्द पीएमएलए कोर्टाच्या न्यायाधीशांनीच खंत व्यक्त केल्यामुळे 'ईडी'पुन्हा एकदा नव्याने चर्चेला आली आहे.**

खा.राऊत यांच्या जामीन अर्जावर सुनावणी चालू असताना ईडीच्या कारभाराची लक्तरे खुद्द पीएमएलए कोर्टाच्या न्यायाधीशांनीच टांगली आहेत. पीएमएलए कोर्ट सुरू झाल्यापासून एकही खटला पूर्ण झालेला नाही आणि याचे श्रेय ईडीला जाते, असे निरीक्षण पीएमएलए कोर्टाचे न्या. एम.जी.देशपांडे नोंदवल्यामुळे ईडीचे खरे रूप आणि खरे काम उघड झाले आहे. राऊत यांना काल पीएमएल कोर्टाने जामीन दिला. १०२ दिवस तुरुंगात राहिल्यानंतर अखेर त्यांची जामिनावर सुटका झाली. हा जामीन देताना पीएमएलए कोर्टाने काही निरीक्षणे नोंदवली आहेत.




### ■ ईडीचे काम काय?
मनी लॉंड्रिंगवर प्रतिबंध आणणे, काळा पैसा वापरणाऱ्यांवर कारवाई करणे, काळा पैसा वापरलेली मालमत्ता जप्त करणे आणि संबंधित प्रकरणाचा तपास करण्याचे काम ईडी या कायद्याअंतर्गत केले जाते. ही एक इकॉनॉमिक्स इंटेलिजन्स एजन्सी आहे. देशातील हवाला, मनी लॉंड्रिंग, भ्रष्टाचार यांसारख्या गोष्टींवर ईडी नजर ठेवते.

### ■ दहा वर्षात एकही खटला पूर्ण नाही चालला
पीएमएलए कोर्ट न्यायालयाच्या स्थापनेपासून एकही खटला पूर्णपणे चाललेला नाही, ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. ईडीने सादर केलेल्या पुराव्यांद्वारे निष्कर्ष काढून न्यायालयाला गेल्या दशकापासून एकही निर्णय देता आला नाही. कोर्टाच्या स्थापनेपासून आणि माझ्या संपूर्ण कार्यकाळात एकही निर्णय झालेला नाही, अशा शब्दात न्या. एम.जी.देशपांडे यांनी खा. संजय राऊत यांच्या जामीन अर्जावरील सुनावणीवेळी ईडीच्या कामावर ताशेरे ओढले.

### ■ अटक चपळाईने... खटला गोगलगाईच्या गतीने
ईडीकडून चपळाईने अटक केली जाते. पण खटले मात्र गोगलगायींच्या गतीने चालवले जातात. खटला पूर्ण न करण्यास ईडी जबाबदार नाही का? पीएमएलए कोर्टात खटला चालवण्याची तरतूद आहे, हे ईडी विसरली आहे. प्रवीण राऊतांनी मे महिन्यात जामिनासाठी अर्ज केला होता. ते अंडरट्रायल कैदी आहेत हे माहीत असूनही ईडीने महिन्याभरापेक्षा जास्त वेळ घेतला. त्यामुळे कोणत्याही आरोपीने दाखल केलेल्या साध्या अर्जांनाही उत्तर देण्यास ईडीने दिरंगाई केली आहे, असे न्यायालयाने नमूद केले आहे.

### ■ ईडी म्हणजे काय?
अंमलबजावणी संचालनालयाची (ईडी) स्थापना १ मे १९५६ रोजी करण्यात आली. भारतात आर्थिक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली. ही देशात आर्थिक कायद्याचे व्यवस्थापन करणारी संस्था आहे. अंमलबजावणी संचालनालय ही संस्था अर्थ मंत्रालयाच्या महसूल विभागाअंतर्गत येते.विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम १९९९ (फेमा) आणि संपत्ती निवारण अधिनियम २००२ (पीएमएलए) या दोन कायद्यांचे पालन या संस्थेमार्फत केले जाते.

## तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत कामांची
## अपर मुख्य सचिव सौनिकांकडून पाहणी

✔ सोलापूर : श्रीक्षेत्र देहू, आळंदी, भंडारा डोंगर, पंढरपूर व पालखीतळ, पालखी मार्ग विकास आराखड्यांतर्गत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, मंदिर परिसर, पंढरपूर शहर येथे वारकरी, भाविकांना तसेच स्थानिक नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या कामांची पाहणी सामान्य प्रशासनाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केली.

यावेळी अप्पर मुख्य सचिव सौनिक यांनी मंदिर, पद दर्शन रांग, मुखदर्शन रांग, विठ्ठल-रुक्मिणी सभा मंडप, दर्शन मंडप, नामदेव पायरी, होळकर वाडा, शिंदे सरकार वाडा, गोपाळ कृष्ण मंदिर, यमाई तलाव, ६५ एकर परिसर येथील पाहणी केली. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत पत्रा शेड येथे नव्याने दर्शन मंडप प्रस्तावित केला असून हा दर्शनी मंडप सर्व सुविधायुक्त व अत्याधुनिक पद्धतीने बांधण्यात येणार आहे. यामध्ये भाविकांना आवश्यक सुविधांचा समाविष्ट करण्यात आला आहे. यावेळी त्यांच्यासमवेत पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमतराव जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, प्रांताधिकारी गजानन गुरव, तहसीलदार सुशील बेल्हेकर, तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचे विशेष कार्य अधिकारी राजेश तितर, नगरपालिका सहआयुक्त आशिष लोकरे, मुख्याधिकारी माळी उपस्थित होते.



■ आषाढी आणि कार्तिकी यात्रेनिमित्त गोपाळपूर येथे गोपाळ कृष्ण मंदिरात पौर्णिमेदिवशी गोपाळकाला केला जातो. यादिवशी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविकांची गर्दी होत असते. येणाऱ्या भाविकांना सुविधा देण्यासाठी गोपाळ कृष्ण मंदिराचा विकास करण्यात येणार येणार आहे. तसेच पायाभूत सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी सौनिक यांना दिली.

■ वारकरी संप्रदायाच्या प्रथा परंपरेचे व मूळ वस्तूचे जतन करून पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार मंदिर व मंदिर परिसराचा विकास करण्यात येत असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी संजीव जाधव वास्तू विशारद तेजस्विनी आफळे यांनी दिली.

## कलावतीनगर येथे तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ सोलापूर : एमआयडीसी परिसरातील कलावती नगरात राहणाऱ्या एका २५ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. बसवराज नरसप्पा कसापहळळी (वय २५) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्या मृतदेह आज सायंकाळच्या सुमारास घरातील भिंतीच्या लोखंडी रॉडला सुतीदोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला फासातून सोडून नरसप्पा (वडील) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तो उपचारापूर्वीच मयत झाला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

## लाच प्रकरणात सरकार पक्षाने केलेल्या अपिलाचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाने फेटाळला

✔ सुराज्य/सोलापूर

लाच घेतल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त झालेल्या कर्मचाऱ्याविरुद्ध उच्च न्यायालयात अपील दाखल करण्यासाठी सरकार पक्षातर्फे दाखल करण्यात आलेल्या प्रस्ताव शासनाच्या विधी व न्याय विभागाने नुकताच फेटाळून लावला.

अक्कलकोट येथील भूमी अभिलेख कार्यालयातील लिपिक अशोक सिद्राम सोनकांबळे (रा.सोलापूर) यास लाच घेतल्याप्रकरणी अँटीकरप्शनच्या पथकाने गुन्हा दाखल केला होता. खटल्याचा निकाल १२मे२०२२ रोजी झाला. त्यात विशेष न्यायालयाने आरोपीला दोषमुक्त ठरविले होते.आरोपीला दोषी ठरवण्यासाठी या निकाला विरुद्ध उच्च न्यायालयात प्रस्ताव दाखल करण्यासाठी सरकार पक्षाने विधी व न्यायविभागाकडे प्रस्ताव दाखल करून परवानगी मागितली होती. शासनाच्या विधी व न्याय विभागाने सर्व कागदपत्राची पडताळणी करून खटला अपील दाखल करणे योग्य नाही असा निकाल दिला आहे. या प्रकरणात अशोक सोनकांबळे तर्फे ॲड. सुरेश पाटील-कुरुलकर ॲड. राजकुमार पाटेकर, ॲड. समाधान दळवे तर सरकार पक्षातर्फे ॲड. लक्ष्मण राठोड यांनी काम पाहिले.



## महापालिकेचे सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांची बदली

### कागल न.प.च्या मुख्याधिकारीपदी नियुक्ती

✔ सुराज्य/सोलापूर

आपल्या कामाने वेगळा ठसा आणि ओळख निर्माण करणारे महापालिकेचे सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांची कोल्हापूर जिल्ह्यातील कागल नगरपरिषद मुख्याधिकारीपदी बदली करण्यात आली आहे. शासनाच्या नगर विकास विभागाने बदलीचे आदेश काढले आहेत.

बदली केल्याने महापालिकेतील सहाय्यक आयुक्त पदासह परिवहन उपव्यवस्थापक पद आता रिक्त झाले आहे. या पदावर शासनाने अद्यापही कोणाचीही वर्णी लावली नसून या पदावर कोण येणार याकडे महापालिका वर्तुळात लक्ष लागले आहे. महापालिका सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांची नगर विकास विभागाने प्रशासकीय कारणास्तव कोल्हापूर जिल्ह्यातील कागल नगरपरिषद मुख्याधिकारी या रिक्त पदावर बदली केली आहे. या संदर्भातील आदेश महापालिका प्रशासनाकडे गुरुवारी सायंकाळी प्राप्त झाले. दिनांक १० नोव्हेंबर पासून त्यांच्या सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात येत असून त्यांनी पदस्थापना दिलेल्या पदावर ११ नोव्हेंबर रोजी रुजू होऊन तसा अनुपालन अहवाल शासनाच्या नगर विकास विभागाकडे पाठविण्या संदर्भातील आदेश देण्यात आले आहेत. श्रीराम पवार हे गेल्या अडीच वर्षांपूर्वी सोलापूर महापालिकेत सहाय्यक आयुक्त पदावर प्रशिक्षणाधिन म्हणून रुजू झाले होते. महापालिकेतील मालमत्ता कर व इतर विभागात उत्कृष्ट कामगिरी बजावली होती. या दरम्यान महापालिकेच्या उत्पन्नात ही मोठ्या प्रमाणात भर पडली होती. यावरून त्यांना महापालिकेच्या वतीने उत्कृष्ट अधिकारी म्हणून गौरव देखील करण्यात आला होता.

शिवाय त्यांच्याकडे परिवहन व्यवस्थापक आणि नंतर परिवहन उपव्यवस्थापक पदावर ही नियुक्त करण्यात आले होते.



### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



जाऊदे, रविवार टेन्शन फ्री झालाय!

कल्याण
580-30-488

मेन बाजार
890-78-170

## सेमी फायनलध्ये कर्णधार रोहितला रडवणारा पराभव

### इंग्लंडचा ४ ओवर आणि १० गडी राखून विजय

✔ सुराज्य/नवी दिल्ली

टी२० विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडने भारताचा १० गडी राखून पराभव केला आहे. त्यामुळे उपांत्य फेरीत भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे.

भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यात झालेल्या उपांत्य फेरीत इंग्लंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तर भारतीय संघाने प्रथम फलंदाजी केली. यावेळी भारताचा वेगवान खेळाडू विराट कोहली आणि हार्दिक पांड्याच्या जोडीने उत्कृष्ट फकटेबाजी करत १६८ धावा केल्या. भारताने इंग्लंडला १६९ धावांचं आव्हान दिलं होतं. परंतु भारताचं आव्हान संपुष्टात आले. केएल राहुलने केवळ ५ धावा केल्या आणि तो माघारी परतला. तर रोहित शर्माने मात्र २७ धावांची खेळी केली. रोहित शर्माही मोठी खेळी करू शकला नाही. त्यामुळे भारताला दुसरा झटका बसला. सूर्यकुमार यादवही १४ धावांवर बाद झाला. भारतीय संघाने एकूण १६८ धावा ठोकल्या होत्या. मात्र, इंग्लंडने तुफान फटकेबाजी करत १६ ओव्हर्समध्ये १७० धावा ठोकल्या आणि सामना सहज खिशात घातला.



दुसरीकडे, क्रिस जोर्डने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. क्रिसमुळेच काही काळ भारतीय संघ दबावात होता. तर क्रिस वोक्सने २ विकेट घेतल्या. एलेक्स हेल्स आणि जोस बटलर या सलामी जोडीने संघाला मोठा विजय मिळवून दिला. या विजयासोबत इंग्लंडने अंतिम सामन्यात तिकीट मिळवलं आहे. आता इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यात थेट रविवारी अंतिम सामना होणार आहे. त्यामुळे हे जेतेपद कोणता संघ मिळवणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



सुराज्य
सोलापूर



पाहिजेत
ग्राफीक डिझायनर

- उमेदवार पदवीधर असावा.
- कोरल ड्रॉ, फोटोशॉप, इन डिझाईन आवश्यक.
- पेज लेआऊट, सर्व प्रकारचे जाहिरात डिझाईन आणि मराठी टायपिंग अनिवार्य.
- रात्रपाळीत काम करण्याची तयारी असावी.
- आकर्षक पगार मिळेल.

ऑफीसचा पत्ता
१५७/१५८ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर ४१३००३
Email : dailysurajyaoffice@gmail.com या ईमेलवर अर्ज करावेत!

# पाऊल मनोमिलनाचे

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे प्रवक्ते तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे राईट हँड असणारे संजय राऊत यांची सुटका झाल्याने राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापेल आणि ठाकरे-राऊत व शिंदे-फडणवीस यांच्यात पुन्हा वादावादी व्हायला लागेल. कडव्या शब्दात आरोप-प्रत्यारोप होत राहतील, अशी सुप्त भीती राजकीय जाणकारांकडून व्यक्त झालेली होती. कारण बाहेर आल्यानंतर राऊतमहाशय स्वस्थ बसणार नाहीत. अगोदर जे केले, त्याप्रमाणे शिंदे-फडणवीस सरकारवर ते हल्ले चढवत राहतील, अशी शंकाही व्यक्त केली गेली होती. ठाकरेंची तोफ आता धडाडणार, अशा धास्तीच्या बातम्याही बाहेर पडल्यानंतर सारे राज्य चिंताग्रस्त झाले होते परंतु गुरुवारचा दिवस राज्याच्या दृष्टीने सुदैवच ठरला, असे म्हणावे लागेल.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राऊत यांच्यात एकमेकांविषयी आपुलकीचा व सौहार्दाचा जो संवाद झाला, तो ऐकल्यानंतर राज्याने सुस्काराच सोडला, असे म्हणावे लागेल. तुरुंगातून बाहेर आल्यानंतर राऊत यांनी पहिल्यांदाच तोंड उघडले. त्यांनी जी काही विधाने केली, त्यातून त्यांची भूमिका नरमाईची दिसून आली. शिंदे-फडणवीस सरकारवर खोचक टोला लगावतानाच फडणवीस यांचे कौतुकही केले. आपण लवकरच फडणवीसांची भेट घेऊ, असे सूतोवाचही त्यांनी केले. याअगोदर फडणवीस यांनी केलेल्या विधानाची राऊत यांनी आठवणही करून दिली. राज्यात कटुता वाढत चालली आहे, असे विधान फडणवीस यांनी केले होते. फडणवीस यांच्या कामाचे राऊत यांनी कौतुक केल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या असतीलही.ते साहजिकच आहे. कारण शिंदे-फडणवीस सरकारवर तुटून पडणारे राऊत यांच्याकडून मवाळपणाची भाषा का यावी? असा प्रश्न आपोआपच समोर येतो. फडणवीसांनी देखील राऊत यांच्या वक्तव्यावर सूचक



प्रतिक्रिया दिली. राउतांच्या इच्छेनुसार आपण भेट देऊ, अशा शब्दात फडणवीस राउतांना प्रतिसाद घातला. उभयतांमधील हा संवाद पाहता पाऊल मनोमीलनाच्या दिशेने पडते आहे, असे मानायला काहीच हरकत नाही पण राउतांना साद घालतानाच फडणवीस यांनी ज्यांच्याकडे अंगुलीनिर्देश केले आहेत, त्यांची भूमिका या पाऊलवाटेवर महत्त्वाची असणार आहे. चर्चा व्हावी. पण, त्यात नेत्यांचाही सहभाग असला पाहिजे. सर्व मित्रपक्षांमध्ये बसून चर्चा व्हायला हवी. कुणावर तरी सोपवून चर्चा करण्याची पद्धत आता यापुढे चालणार नाही, अशा शब्दात फडणवीस यांनी आपला बाण 'मातोश्री'च्या दिशेने भिरकावला आहे.भाजपा नेते अमित शहा यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत आपल्याला मुख्यमंत्रिपद देऊ केले होते परंतु भाजपाने दिलेला शब्द पाळला नाही,अशी ओरड उद्धव यांची पहिल्यापासूनच आहे. त्याला फडणवीस यांनी हरकतही घेतलेली होती. भाजपाने असा शब्द दिलेलाच नव्हता, असे स्पष्टीकरण फडणवीस यांना वारंवार द्यावे लागले होते. म्हणूनच की काय? चर्चेत नेतेही असायला पाहिजेत आणि मित्रपक्षही सोबत असायला हवेत, या फडणवीस यांच्या भूमिकेमागे बरेच काही दडले आहे. समजा फडणवीस यांच्या भेटीत राऊत यांनी नव्याने युती करण्याचा प्रस्ताव आणला तर राजकीय समीकरणे पुन्हा बदलतील. समजा युतीचे प्रयत्न व्हायला लागले तर अनेक प्रश्न उपस्थित होतील. एक उद्धव हे चर्चेच्या बैठकीला उपस्थित राहतील की नाही? युतीमध्ये शिंदे गटाला सामावून घेण्याचा आग्रह फडणवीस धरतील पण उद्धव यांना तो मान्य होईल की नाही? हा दुसरा तर तिसरा प्रश्न अत्यंत गहन आहे, तो म्हणजे मनसेचे संस्थापक राज यांचे काय करायचे? राज यांनी भाजपाऐवजी आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाशी जास्त लगट ठेवली आहे.मनसे-शिंदे गट यांच्यात युती होण्याच्या बातम्याही लपून राहिलेल्या नाहीत. शिंदे गट आणि राज यांना युतीत सामावून घेण्याचा प्रस्ताव उद्धव यांच्याकडून मान्य होईल का? अशी शंका फडणवीस यांना बहुधा लागून असावी. नव्याने मनोमीलन करायचेच झाले तर अंदर एक-बाहर एक अशी भूमिका आता नकोच. ते करायचे आहे ते उघडच. आमने-सामने, अशी फडणवीस यांची रोखठोक भूमिका दिसते. पण राज व शिंदे गटाच्या बाबतीत उद्धव हे एक पाऊल मागे घेतील, अशी शाश्वती कुणाकडूनच दिली जात नाही. युतीचा निर्णय आताच व्हायला हवा. कारण, लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत तसेच लोकसभा व विधान सभेचे घोडा मैदानही जवळ येत आहे. युती शिवाय भाजप-शिवसेनेला पर्यायच राहिला नाही, असे राजकीय विश्लेषकांचे गणित आहे. महाविकास आघाडीच्या जागा वाटप गणितात शिवसेना बसणारच नाही, असा राजकीय विश्लेषकांचा व्होरा आहे. भाजप-शिवसेना यांची युती व्हायलाच पाहिजे, अशी महाराष्ट्राची आजही भावना आहे.

---

**न्यायजगत**

# न्यायालयानेच लोळवले !

**ईडीला एक नव्हे तर दोन न्यायालयांची सणसणीत चपराक मिळाली आहे. या स्वायत्त संस्थेचा उपयोग राजकीय वचपा काढण्यासाठी झाला, हे लपलेले नाही. त्यामुळे ईडीच्या नावे ढोल बढवणाऱ्या ढोंगी लोकांचे पितळही उघडे पडले. विरोधकांना डळमळीत करण्याचा डाव रचला खरा. पण त्यातून विरोधकांनाच बळ मिळाले आहे. तो रचणाऱ्या धुरिणांची खेळी त्यांच्याच अंगावर उलटली आहे. अजूनही ते खेळीत कच्चेच आहेत. असे म्हणता येईल. काय आहे, जेव्हा माणसाला घमेंडीची बाधा होते, तेव्हा तो त्याच्या विवेकबुद्धीचा उपयोग करण्यापासून लांबच राहतो आणि त्याची जागा सूडबुद्धीने व्यापली जाते. हे बिथरल्याचे ठळक लक्षण असते.**

नियम, कायदे यांना बासनात गुंडाळून लोकशाहीचा गळा कसा घोटला जाऊ शकतो, याचे प्रात्यक्षिक महाराष्ट्रात झाले. पण ते अल्पावधीतच अयशस्वी ठरले. कायद्यानुसार न जाता मनाला वाटेल त्या प्रकारे मार्गक्रमण करणे यासाठी ईडीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार? न्यायालयाचा वेळ वाया घालवला गेला. याची भरपाई कशी होणार? म्हणजे चक्क न्यायालयालाच तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ फसवले गेले.

शेवटी न्यायालयानेच त्यांना लोळवले. राजकीय आकसात न्यायालयालाही ओढून वैचारिक दारिद्र्य काय असते? हे स्वतःहून दाखवून दिले. हा न्यायालयाचा अनादरच होय. राजकारणी न्यायालयालाही सोडत नाहीत आणि आम्ही संविधानाचे रक्षक वगैरे फुशारक्या मारत फिरत असतात. संविधानाचा आदर करायला शिकले पाहिजे. त्यासाठी एखादे मंथन शिबिर घेता येते का ते पहाता येईल? दोषींवर ठोस पुराव्यांसह कारवाई व्हावी याविषयी कोणाचे दुमत नाही. तसे पुरावे असतील तर शिक्षा अटळ असते अन्यथा जामीन संमत होत कारागृहातून सुटका होते.

ईडीच्या कारवाईत पारदर्शकता नाही हे तेव्हाच स्पष्ट होत होते जेंव्हा ते केवळ विरोधकांना लक्ष्य करत होते. यामुळे आता असे होणार की, विरोधकांना लक्ष्य करत घोटाळेबाज म्हणून कितीही भूमी धोपटली तरी त्यावर विश्वास ठेवणे अशक्यच. केंद्रीय संस्था जेव्हा सत्ताधारी मंडळींचे बटीक बनतात तेव्हा त्यांना स्वतःचे अस्तित्व रहात नाही. कारण, त्यात काम करणारा व्यक्ती हा अधिकारी असला तरी सुद्धा एक नोकरी करणारा कर्मचारीच असतो. त्याला त्याच्यासह कुटुंबाची चिंता असणारच. मग काय जे सत्तेत असतील ते म्हणतील तसे काम करायचे आणि नोकरी वाचवायची. उघडपणे हे कोणीही सांगत नसले तरी ते न समजण्यासाठी जनता दुधखुळी नाही.



लोकांना कोणत्याही प्रकरणाचा अल्पावधीतच विसर पडतो. यात १०० टक्के तथ्य नाही. जे निःपक्षपातीपणे, चौकसपणे विचार करतात ते सत्यावर आधारितच मार्ग पकडतात. त्यामुळे लोकांना गृहीत धरून मनमानी आणि गलिच्छ राजकारण करणे थांबवा. मुख्य म्हणजे स्वतःच न्यायालय आणि न्यायाधीश होऊ नका.

ज्यांच्यावर आधी भ्रष्टाचारी म्हणून आरोप केले ते इकडून तिकडे गेल्यावर निर्दोष कसे झाले? हे कोडे आहेच. अशांची यादी भली मोठी आहे. या सत्तेसाठीच्या उचापती होय. याने भ्रष्टाचाराचे उच्चाटन न होता पोषणच होईल. कारण भ्रष्ट व्यक्ती एका पक्षातून दुसऱ्या पक्षात गेला तरी भ्रष्टाचार करण्याची त्याची मूळ वृत्ती बदलत नसते. शिवाय तशी कोणी हमीसुद्धा देत नाही. त्यासाठी त्यांना कायदेशीर कडक शासनच अनिवार्य आहे.

सत्तेची मस्ती डोक्यात भिनलेले आणि त्यांच्या तालावर नाचणारी ईडी यांचे वस्त्रहरणच झाले आहे. तरीही 'गिरे तो भी टांग उपर' प्रमाणे आम्हीच कसे बरोबर हे ठणकावून सांगण्याचा आटापिटा होईल. त्याला लोकांच्या लेखी कवडीचीही किंमत नसेल.

'आझादी का अमृतमहोत्सव' भ्रष्टाचाराचे उच्चाटन करून साजरा करण्यात देश अजूनही किती मागे आहे आणि भ्रष्टाचार करणारे कसे मोकाट आहेत. याकडे लक्ष वेधते. देशाच्या अर्थव्यवस्थेची आणि देशातील जनतेचीसुद्धा आर्थिक हानी करणाऱ्या भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी राजकीय पूर्वग्रहदूषितपणा नसावा. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्याकडून चार गोष्टी शिकल्या तर देशाचे भलेच होईल. त्यासाठी सर्वकाही मलाच कळते या भ्रमाच्या भोपळ्यातून बाहेर यावे लागेल. खा. संजय राऊत प्रकरणाच्या दृष्टीने त्रयस्थ रहात न्यायालयीन भूमिकेतूनच पाहिल्यावर वरील सूत्रे लक्षात येतात. त्यांचा पक्ष आणि त्यांची विचारधारा यांच्याशी माझा संबंध नाही. पण जेव्हा न्यायालय कडक शब्दांत सुनावते तेव्हा जागरूक नागरिक म्हणून सतर्क होणे आलेच. बाकी ताशेरे न्यायालयाने ओढलेले आहेच.

सामान्य माणसांची एकच अपेक्षा असते ती म्हणजे दोषींना शिक्षा व्हावी. जे पत्राचाळ प्रकरण गाजत आहे. त्यातील निवासींकडे लक्ष देत त्यांना त्यांच्या हक्काची घरे लवकरात लवकर मिळावी म्हणजेच त्यांच्या डोक्यावर त्यांचे हक्काचे छप्पर मिळावे आणि गेली बरीच वर्षे जे हाल ते सोसत आहेत त्यातून त्यांची सुटका व्हावी. हीच प्रामाणिक अपेक्षा.

**- जयेश राणे, मुंबई.**

---

**टुडेज ब्लॉग**

# सपशेल लोटांगण

**विश्वचषक जिंकण्याचे दिवास्वप्न बघणाऱ्या भारतीय संघाचा माज आज इंग्लंडने उतरवला आणि तब्बल दहा विकेटने भारताचा मानहानिकारक पराभव करून दिमाखात अंतिम फेरी गाठली. प्रथम अचूक गोलंदाजी आणि नंतर आक्रमक फलंदाजी करून इंग्लंडने भारताला गुडघे टेकायला भाग पाडले. भारतीय खेळाडूंनी देखील सपशेल लोटांगण घातले. अंतिम फेरीत इंग्लंडचा मुकाबला रविवारी पाकिस्तानशी मेलबोर्न येथे होईल.**

इंग्लंडने नाणेफेक जिंकून ऍडलेडच्या काहीशा वेगवान खेळपट्टीवर भारताला फलंदाजी दिली. जखमी मार्क वूड आणि डेव्हिड मलान जागी इंग्लंडने क्रिस जॉर्डन आणि फिल्म सॉल्टला संघात घेतले तर भारताने विजयी संघच कायम ठेवला.

आयसीसी बाद फेरीत अपयशाची रोहित आणि राहुलची परंपरा आजही चालूच राहिली. दुबळ्या संघाविरुद्ध धावा करणारा राहुल आज स्वस्तात बाद झाला तर सबंध विश्वचषकात धावांसाठी झगडणारा रोहित आजही अडखळला आणि अखेरीस बाद झाला. विराटने एक बाजू लढवत अर्धशतक झळकावले खरे पण अपेक्षित धावगती तोही राखू शकला नाही. आघाडीच्या फलंदाजाचे अपयश नेहमीप्रमाणे सूर्याने आपल्या खांद्यावर घेण्याचा प्रयत्न केला आणि फटकेबाजी करण्याच्या नादात तोही बाद झाला. हार्दिक पांड्याने शेवटी तुफानी फटकेबाजी केली आणि ६३ धावा फटकावल्या त्यामुळे भारताला १६८ धावांचा पल्ला गाठता आला.

बटलरने सुरुवातीलाच चार चौकार मारून आक्रमक सुरुवात केली आणि ॲलेक्स हेल्सच्या साथीने सहाव्या षटकातच साठ धावा फलकावर लावल्या. पॉवर प्लेमध्ये कशी फलंदाजी करावी याचा धडा रोहित आणि राहुलला दिला. बळी मिळवायची आवश्यकता असताना अश्विनने नेहमीप्रमाणे फलंदाजचा पाय पकडून नकारात्मक गोलंदाजी सुरू केली आणि अपेक्षेप्रमाणे निराश केले.अक्षर पटेलविषयी न बोललेलेच बरे. बटलर आणि हेल्सने षटकार आणि चौकारांची आतषबाजी करून भारतीय गोलंदाजीच्या मर्यादा स्पष्ट केल्या आणि अगदी सहजपणे दहा विकेट राखून भारताला चारीमुंड्या चित केले.

राहुल हा टी२० मध्ये भारतीय संघांसाठी आघाडीला खेळू नाही शकत हे सत्य आहे. हालचाली संथ




झालेल्या रोहितला ऑस्ट्रेलिया मधल्या वेगवान आणि चेंडू उसळणाऱ्या खेळपट्ट्यावर अपयश आले यात फारसे आश्चर्य नाही. पाकिस्तान विरुद्ध अविस्मरणीय खेळी करणारा आणि सातत्यपूर्ण धावा करणारा विराट आणि फलंदाजीची परिभाषा बदलून टाकणारा सूर्या या जमेच्या बाजू म्हणता येतील. गोलंदाजीत भुवी अर्शदीप आणि शमीने सातत्यपूर्ण गोलंदाजी केली. मात्र, पुरेसे धावांचे पाठबळ नसल्याने ते आज अपयशी ठरले.

अश्विनच्या टी२० कारकिर्दीवर आतातरी पूर्णविराम लावावा अन्यथा लवकरच रोहित आणि द्रविडला उत्तरे देताना नाकी नऊ येतील. अक्षर पटेल अत्यंत सुमार वाटला. पंत आणि कार्तिकपेक्षा किशन आणि सॅमसनचा विचार व्हावा. प्रशिक्षक द्रविड आणि रोहित यांची संघ निवड आणि डावपेच महत्त्वाच्या सामन्यात सपशेल चुकले हे पण तितकेच खरे. एकंदरीत कागदावरचे वाघ मैदानात ढेपाळले हे सत्य आहे आणि यातून धडा घेऊन भविष्यात योग्य ते निर्णय निवडसमिती घेईल ही अपेक्षा. विश्वचषक जिंकला नाही तरी चालेल पण पाकिस्तानला हरवलेच पाहिजे, ही सर्वसामान्य भारतीयाची माफक अपेक्षा आपल्या खेळाडूंनी मात्र पूर्ण केली, एवढेच!

---

**बोधकथा**

## दुर्लभ मानव जन्म



एकदा एका राजाने खुश होऊन लोहाराला चंदनाची बाग भेट दिली. लोहाराला चंदनाच्या झाडांच्या किंमतीचे नॉलेज नव्हते त्यामुळे त्याने त्या झाडांना कापून त्यांचा कोळसा करून विकला. हळू हळू सम्पूर्ण बाग रिकामी झाली.*

एक दिवस असेच राजा त्याच्या घरा जवळून जात होता, राजाला वाटले लोहार आता खुप श्रीमंत झाला असेल. परंतु प्रत्यक्ष पाहिल्यावर लोहाराची परिस्थिति पहिल्या सारखीच आहे असे दिसले राजाला आश्चर्य वाटले. सत्य समजल्यानंतर राजाने त्याला विचारले तुझ्याकडे एखादे लाकुड़ शिल्लक आहे का ? तेव्हा लोहारने कुऱ्हाडीचा दांडा दाखविला.

राजाने त्याला चंदनाच्या व्यापाऱ्या कडे पाठवले. तेंव्हां त्या छोटयाश्या तुकडयाचे त्याला खुप पैसे मिळाले. लोहार खुप रडू लागला, त्याने राजाला अजुन एक बाग देण्याची विनंती केली तेव्हा राजा म्हटला अशी भेट वारंवार भेटत नाही.


मित्रांनो आपले आयुष्य त्या लोहारासारखेच आहे मानवी जीवनाच्या मुल्यांचे महत्व, आपल्याला जीवनाचे शेवटचे श्वास चालू असताना समजते. पण त्यावेळेस आपण म्हणतो देवा मला अजून थोडा वेळ दे, परंतु त्यावेळी वेळ मिळणे अशक्य असते. मानवी जीवन अनमोल आहे. असे जीवन परत मिळणार नाही.

**तात्पर्य : या जगात दुर्लभ गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे, मनुष्य देह त्या देहाचा कोळसा करायचा की, चंदन हे आपले आपण ठरवायचे.**

---

**जन्म हा अखेरचा**

## धर्माचारस्थल - २



ज्या गाडीचे तिकिट घेतले आहे त्याच गाडीत तुम्ही बसले पाहिजे. दुसऱ्या गाडीत बसाल तर तुम्हांला उतरून दिले जाईल. म्हणून असे म्हटले गेले आहे :-

**'जिव्हाग्रे वर्तते लक्ष्मी जिव्हाग्रे मित्र बांधवा: । जिव्हाग्रे बंधन प्राप्तिः जिव्हाग्रे मरणं ध्रुवम्।।**

जिभेमुळे माणूस काय काय मिळवतो? तुमच्या जिभेवर लक्ष्मीचा निवास असतो. तुमचा सारा व्यवहार जिभेवरच अवलंबून असतो. तुम्ही योग्य बोलाल, तोलून मापून बोलाल तर तुम्हांला लक्ष्मी प्राप्त होईल. तुमच्या जिभेचा व्यवहार चांगला नसेल तर तुमच्या जवळ असलेली लक्ष्मीदेखील तुम्हांला सोडून जाईल. जिभेमुळेच तुम्ही मित्र जोडू शकता. ज्याचा मित्रपरिवार मोठा असतो, त्याची वाणी चांगली असते असे निश्चित समजावे. गोड बोलल्यानेच मित्र लाभत असतात. म्हणून ज्याची वाणी गोड असते, त्याच्या अवतीभोवती मित्रमंडळीचा आणि बांधवांचा वेढा पडलेला असतो. ज्याची वाणी चांगली नसते, त्याला घरातली माणसेदेखील बाहेर हाकलून देतात. जिभेमुळेच बंधनात पडावे लागते. गोड पाणी असलेल्या पोपटाला लोक पिंजऱ्यात बंदिस्त करुन ठेवतात. कर्कश ओरडणाऱ्या कावळ्याला पिंजऱ्यात घालून ठेवले जात नाही.

**(क्रमशः) – काशी जगद्गुरु**
**डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

**जनमानस**

## अनेक भागात मजुरांचा तुटवडा

राज्यात अहमदनगर सांगली भागात मजुरांचा तुटवडा जाणवत आहे. अहमदनगर जिल्ह्यातील कुकडी, घोड, भीमा, सिनेच्या पाण्यामुळे त्या भागात ऊस शेती तसेच फळबागा यामध्ये वाढ झाली आहे. तिच परिस्थिती सांगली भागात आहे. तेथेही तासगाव, मणेराजुरी भागात द्राक्षाचे, मळे अनेक शेतकऱ्यांनी फुलविले आहेत. पण, सध्या या भागात मजुरांचा तुटवडा मोठ्या प्रमाणात जाणवतो आहे. ही बातमी नुकतीच वाचली. कित्येक शेतकऱ्यांच्या मालकांना सकाळीच उठून मजुरांचा शोध घ्यावा लागतो आहे. त्यासाठी त्यांना जमेल त्या वाहनाने शेतात आणणे तसेच त्यांना शुद्ध पाणी, दोन वेळचा चहा याची सोय करावी लागत आहे. काम झाल्यानंतर त्यांना परत त्यांच्या घरी सोडावे लागत आहे. एकूणच मजुरांचा तुटवडा आहे. त्यामुळे ही परिस्थिती उद्भवली आहे. युवा वर्ग शिक्षण व नोकरीच्या निमित्ताने शहरात गेला व तो तेथेच स्थायिक होत आहे. अशा परिस्थितीत अनेक मजूर अन्य राज्यातून येऊन शेतातील कामे करत आहेत. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास नजीकच्या काळात शेतात मजूर मिळणे दुरापास्त होणार आहे. एकूणच कष्ट करणारा मजूर आपल्या श्रमांनी काम करून येथे घरे जमिनी सुद्धा खरेदी करू लागले आहेत. **- शांताराम वाघ, पुणे.**

## घातक वस्तूंचा हव्यास नको

अनेक अनावश्यक वस्तू आणल्या जातात, सेल डिस्काउंट फ्री वस्तूंच्या नादात खरेदी होते. काही दिवसांनी त्याच वस्तू कुठे ठेवायच्या असा प्रश्न पडतो. पण तरीही वस्तूंचा हव्यास मनात असतोच. यातून निर्माण होणारा कचरा फार मोठा असतो व एकंदर पर्यावरण यामुळे प्रभावित होते. पण याचा विचार कुठेही होत नाही. वस्तूंनी घर भरून जाते. वस्तूंच्या खरेदी विक्रीवर बाजारपेठ व आर्थिक उलाढाल अवलंबून असते. त्यामुळे यावर काही विचार करणे शक्य नाही असे वाटते. पण त्यातही पर्यावरणाला घातक अश्या वस्तूंची खरेदी होऊ नये असे वाटते.

**- अर्चना काळे, नाशिक.**

---

# अमेरिकेतील शिक्षण व्यवस्था

शिक्षणाच्या दृष्टीने प्रशासकीय यंत्रणेचा विचार केला तर गव्हर्नर आणि स्टेट सुपरिटेंडेंट ही दोन्ही महत्त्वाची पदे लोकांमधून निवडून दिली जातात, जी सर्वोच्च पदे आहेत. सरकार बदलले की या दोन्ही पदांचा पदभार वेगवेगळ्या व्यक्ती घेतात. पण इथल्या लोकांची प्रगल्भता पाहता शिक्षण विभागाच्या स्टेट सुपरीटेंडेंट पदी कायमच शिक्षणाशी संबंधित व्यक्तींची निवड होते. आपल्याकडे अशी अपेक्षा व्यक्त केली जाते, मात्र तसे घडताना दिसत नाही. प्रत्येक डिस्ट्रिक्टमध्ये स्कूल बोर्ड स्थापन केलेले असते, जे त्या त्या डिस्ट्रिक्टमधील शाळांवर नियंत्रण ठेवणे, निधींचे वितरण करणे आदी जबाबदाऱ्या पार पाडते. दरवर्षी राज्य सरकार त्या त्या विशिष्ट राज्यातील शिक्षणाशी संबंधित गुणवत्ता निकष जाहीर करते, अर्थात हे निकष म्हणजे अभ्यासक्रम नव्हे हे समजून घ्यायला हवे. हे निकष मुख्यत: इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, गणित, विज्ञान व समाजशास्त्र या विषयाशी संबंधित असतात. आणि याच निकषाच्या आधारे प्रत्येक शाळेचे रँकिंग ठरवले जाते आणि त्यानुसार त्यानं प्रति विद्यार्थी अनुदान दिले जाते. इथे शाळांना दिले जाणारे अनुदान हे फक्त आणि फक्त गुणवत्तेच्या आधारेच दिले जाते. सर्व शाळांची , इ, उ, ऊ अशी रँकिंग जाहीर केली जाते आणि त्यानुसार जास्तीत जास्त ७००० इतके अनुदान एका विद्यार्थ्यामागे दिले जाते. राज्याने जाहीर केलेल्या गुणवत्ता निकषानुसार इथे प्रत्येक शाळा वेगवेगळा अभ्यासक्रम तयार करू शकते. मात्र, सध्या प्रत्येक डिस्ट्रिक्ट हा अभ्यासक्रम तयार करते.

इथे तीन प्रकारच्या शाळा पाहायला मिळतात, पब्लिक, चार्टर आणि होम स्कूल. पब्लिक स्कूल म्हणजे आपल्याकडील सरकारी शाळा, चार्टर स्कूल म्हणजे खाजगी शाळा होत. सध्याच्या घडीला जवळपास ९५ टक्के शाळा या सरकारी शाळा आहेत. या शाळांमध्ये सर्व जातिधर्माची, वेगवेगळ्या भाषा बोलणारी मुले शिक्षण घेतात. पब्लिक स्कूलमध्ये मोफत शिक्षण मिळते. याउलट चार्टर स्कूलमध्ये ट्यूशन फी आकारली जाते. चार्टर स्कूल या धार्मिक आणि भाषिक आधारावर प्रवेश देतात. सध्या या चार्टर स्कूलचे प्रमाण वाढत चालले असून या शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाविषयी अनेक शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ चिंता व्यक्त करत आहेत.

अनेक राज्यांमध्ये तुम्ही राहत असलेला भाग ज्या शैक्षणिक डिस्ट्रिक्टच्या कार्यक्षेत्रात येतो तिथच प्रवेश घेता येतो असा नियम आहे. वेगळ्या डिस्ट्रिक्ट मध्ये जाऊन शिक्षण घ्यायचे असेल तर किमान एक वर्ष अधिवास असला पाहिजे, नसेल तर जादा शुल्क भरावे लागते. इथे सर्वच सरकारी शाळांमध्ये समान दर्जाचे शिक्षण दिले जाते, त्यामुळे मोठ्या पदांवरील व्यक्तींची मुले देखील पब्लिक स्कूलमध्येच शिक्षण घेताना दिसतात. इथे सहाव्या वर्षी मूल पहिलीच्या वर्गात दाखल होते, त्यापूर्वी प्री स्कूल (३-५ वर्षे) आणि पाचव्या वर्षी एलिमेंटरीमध्ये जाते. पहिली ते पाचवी हा विभाग प्राथमिक शिक्षण म्हणून ओळखला जातो. सहावी ते आठवीला ज्युनियर हायस्कूल म्हणून ओळखले जाते तर नववी ते बारावी. हा गट हायस्कूल म्हणून ओळखला जातो.



प्राथमिक स्तरावर गणित, भाषा (इंग्रजी, स्पॅनिश अथवा त्याची मातृभाषा) कला, संगीत, इतिहास, भूगोल व संगणक हे विषय शिकवले जातात, तर हायस्कूलच्या स्तरावर मात्र मुलांना वेगवेगळे विषय निवडण्याचे स्वातंत्र्य मिळते. काही शाळांमध्ये तब्बल २० विषय उपलब्ध असतात.

अनेक वेळा असेही पाहण्यात आले आहे की, केवळ एक-दोन विद्यार्थ्यांनी संबंधित विषय निवडला आहे म्हणून त्या शाळेत विशेष शिक्षक नियुक्त केला आहे. शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर लक्षात घेतले टीआर अमेरिकेत एका वर्गात सरासरी १६ विद्यार्थी असतात. तर ॲरिझोना राज्याचा विचार केला तर हेच प्रमाण २४ विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असे आहे. अर्थात इथे हे गुणोत्तर अधिक असण्यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे शिक्षकांची कमतरता. अर्थात याविषयी नंतर लिहिणार आहे.

इथल्या शाळांमध्ये १२ वी पर्यंत मोफत शिक्षण दिले जाते. अर्थात जेव्हा मोफत शिक्षण असा उल्लेख केला जातो तेव्हा काय काय मोफत मिळते? हे जाणून घ्यावे लागते. इथल्या शाळांमध्ये जाण्यासाठी मोफत स्कूल बस असतात, पालकांच्या आर्थिक कुवतीनुसार शाळेत जेवण मोफत मिळते. पाठ्यपुस्तके, वह्या, पाटी-पेन्सिलसह सर्व प्रकारांचे लेखन साहित्य मोफत दिले जाते. मुलांच्या दप्तरात केवळ त्यांचे कपडे, पाणी बाटली किंवा त्यांच्या गरजेचे साहित्य असते. सर्वच शैक्षणिक साहित्य शाळेत उपलब्ध असल्याने १२वी पर्यंत मुलांच्या शिक्षणासाठी पालकांना फारसा खर्च करावा लागत नाही. अमेरिकेतली शिक्षणाविषयी नोंदवलेल्या निरीक्षणावर आधारित हा लेख लिहिला आहे. एकाच लेखात संपूर्ण शिक्षण व्यवस्था समजून घेणे काहीसे अवघड असल्याने इतर बाबी पुढच्या लेखात मांडल्या जातील. पुढच्या लेखात शाळांमधील अनुभवाबद्दल वाचायला मिळेल. **(उत्तरार्ध) - रणजितसिंह डिसले.**

**(ग्लोबल टीचर अ‍ॅवॉर्ड विजेते शिक्षक रणजितसिंह डिसले हे सध्या फुलब्राईट फेलोशिपसाठी अमेरिकेत आहेत.)**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# ऊस दराची कोंडी फुटली; संघर्ष समितीला यश



✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर-सांगली जिल्ह्याच्या सीमेवरती असलेल्या व सद्गुरू श्री श्री रविशंकर यांच्या कृपाशीर्वादाने सुरू असलेल्या सद्गुरु श्री श्री साखर कारखाना लिमिटेड राजेवाडी या कारखान्याने शेतकऱ्यांच्या हिताचा उद्देश समोर ठेवून सन २०२२/२३ हंगामासाठी गळीतास आलेल्या ऊसाला पहिला हप्ता २५०० हजार प्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला.

गेली महिनाभर चाललेल्या ऊस दर संघर्ष समितीच्या आंदोलनाला अखेर यश आले असून चेअरमन एन शेषागिरीराव, व्हाईस चेअरमन बाळासो कर्णवर पाटील व संचालक मंडळाचे आणि कारखान्याचे सी.एफ. ओ रोहित नारा यांना शेतकरी वर्गातून धन्यवाद देऊन आनंद व्यक्त केला जात आहे.

## ■ 'सदगुरू'चा पहिला हप्ता २५०० शेतकऱ्यांच्या खात्यात जमा : कर्णवर पाटील

आमच्या कारखान्यांचा हा अकरावा गळीत हंगाम असून मागील दहा हंगामात आम्ही एफआरपी पेक्षा १७७ रू जादा दिले आहेत. तरीही काही समाजकंटक आमच्या कारखान्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न करीत असतात. यावर्षी गळीतास येणाऱ्या ऊसाचा पहिला हप्ता २५०० रूपये प्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यास सुरू केले आहे. वजन काटा कुठेही उभा करा त्यासाठी लागणारा निम्मा पैसा सदगुरु कारखाना देईल व निम्मा पैसा तुम्ही उभा करा.म्हणजे दुध का दुध और पाणी का पाणी होईल. परंतु आता तरी शेतकऱ्यांनी तुमचे हित बघणाऱ्या कारखान्यां बाबतीत गैरसमज करून घेवू नये.आणि ज्या सभासदांना खाजगी वजन काट्यावर ऊस वजन करून आणायचा असेल त्यांनी बिनधास्त करून यावे.

**- बाळासाहेब कर्णवर-पाटील**
व्हा.चेअरमन, सदगुरु कारखाना

आमच्या आंदोलनाला यश आलेले आहे.

अन्य साखर कारखाने जोपर्यंत आमची मागणी पुर्ण करत नाहीत तो पर्यंत त्या - त्या साखर कारखान्याच्या विरोधात ऊसदराचे आंदोलन सुरूच ठेवणार असा इशारा देत त्यांनी या कारखान्यांचा आदर्श घ्यावा अन्यथा आंदोलन तिव्र करू.

**- दिपक भोसले,**
ऊसदर संघर्ष समिती समन्वयक

सोलापूर जिल्हा ऊस दर संघर्ष समितीने सन २०२२- २३ या गाळप हंगामातील ऊसाला पहिली उचल २५००/- रुपये व अंतिम दर ३१००/- रुपये मिळावा असे आवाहन केल्यानंतर राजेवाडी येथील कारखान्याने पहिली उचल २५००/- रुपये जाहीर केली हे अभिनंदनिय आहे.परंतु जिल्ह्यातील इतर कारखान्यांनीही ऊस परिषदेमध्ये जाहीर केलेल्या दराप्रमाणे अंतिम दर ३१००/- रुपये मिळावा यासाठी आम्ही सातत्याने संघर्ष करू व घामाचा दाम मिळवू.

**- माऊली हळणवर,**
समन्वयक ऊसदर समिती

### इतर कारखान्यांनी सदगुरूचा आदर्श घ्यावा

सोलापूर जिल्ह्यात पहिली उचल अडीच हजार रुपये जाहिर करावी यासाठी मागील महिन्याभरापासून ऊसदर संघर्ष समितीच्यावतीने आंदोलन सुरु करण्यात आलेल्या आंदोलनाला यश आले आहे एक महिन्यापासून ऊसदरासाठी सोलापूर जिल्ह्यात आंदोलन् सुरू आहे. आमची मागणी तीन हजार शंभर रुपयांची आहे. त्यातील पहिला हप्ता हा अडीच हजार रुपये मिळावा अशी मागणी आहे. सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी अद्याप अडीच हजार रुपये पहिली उचल जाहिर केलेली नाही. मात्र सद्गुरू साखर कारखान्याने आज ऊसदराची कोंडी फोडली असून पहिली उचल अडीच हजार रुपये देण्याचे जाहिर केले आहे.

### २५०० रुपयांचा पहिला हप्ता

ऊस उत्पादक शेतकरी केंद्रबिंदू मानून राजेवाडी चा सदगुरु कारखाना काम करीत आहे. लागवडीखालील क्षेत्र वाढवून उपयोग नसून प्रतिएकरी ऊस उत्पादन वाढवून किफायतशीर परतावा मिळण्यासाठी कारखाना प्रयत्नशील आहे. यंदा गळितास येणाऱ्या उसास २५०० रुपयांचा पहिला हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले आहेत.



## संतोष केंगनाळकर शिवसेनेत; आदित्य ठाकरेंनी बांधले शिवबंधन


✔ **सोलापूर** : भाजपमध्ये नेत्यांचे इनकमिंग सुरू असतानाच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने भारतीय जनता पार्टीला सोलापूर शहरात दणका दिला आहे. दक्षिण भारतीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष संतोष केंगनाळकर यांना युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे सोलापूर दौऱ्यावर असताना संतोष केंगनाळकर यांना शिवबंधन बांधून पक्षप्रवेश दिला आहे. यावेळी भाजपच्या दोन्ही आमदारावर टिका करत हा प्रवेश केला आहे. संतोष केंगनाळकर गेली १६ वर्षांपासून भारतीय जनता पार्टीत सक्रियपणे कार्य केले. परंतु पक्षाचे शहरातील दोन्ही आमदार आणि खासदार पक्षातील कार्यकर्त्यांना विश्वासात घेत नाहीत. पक्षाच्या आदेशानुसार काम करूनही प्रामाणिक आणि पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांना न्याय मिळत नाही. या त्रासाला कंटाळून ६०० कार्यकर्त्यांसह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्ष जी जबाबदारी देईल त्या माध्यमातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष घराघरापर्यंत पोहोचवण्यासाठी कार्य करण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी शिवसेनेचे संपर्कप्रमुख अनिल कोकिळ, जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे, उपजिल्हाप्रमुख अमर पाटील, अक्कलकोट तालुका प्रमुख आनंद बुक्कानुवरे, उपजिल्हाप्रमुख भिमाशंकर म्हेत्रे, उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील, राजु बिराजदार, भाजपचे दक्षिण पश्चिम मंडल उपाध्यक्ष सचिन चौगुले, संतोष माळी, संगमेश्वर बिराजदार, विठ्ठल संगोळगी, यल्लप्पा कोळी, शिवा रामपुरे, सिध्दाराम कुठेकर, शिवा बगले, प्रदिप जाधव, अजय लुटटे, उदय वळसंगे, केदार तमगोंडा, राजकुमार गुणापुरे, संतोष रत्नाकर, बसु कोळी, मल्लु पाटील आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संघटनांच्या स्पर्धांना महत्त्व येणार : कसगावडे

✔ **सोलापूर** : संघटनेच्या स्पर्धेमधूनच आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये निवड होत असल्यामुळे येत्या काळात संघटनेच्या स्पर्धांना विशेष महत्त्व प्राप्त होणार आहे अशी माहिती पुणे विभागाचे प्रभारी उपसंचालक महादेव कसकावडे यांनी आज येथे माहिती दिली. सोलापुर जिल्हाक्रिडाधिकारी कार्यालय, सोलापूर महापालिका क्रिडा विभाग, दयानंद महाविद्यालय यांच्या वतीने क्रिडा संघटकांची बैठक आयोजित केली होती. या वेळी ते बोलत होते. यावेळी क्रिडा अधिकारी नितीन तारळकर, महापालिकेचे क्रिडा अधिकारी मुर्तुज शहापुरे, मुख्याध्यापक जितेंद्र पवार, क्रिडा अधिकारी गणेश पवार, क्रिडा अधिकारी सत्येन जाधव, क्रिडा अधिकारी महेश धारूरकर, सुप्रिय गाढवे, तानाजी मोरे उपस्थित होते. कसगावडे म्हणाले, पुणे, मुंबई मध्ये क्रिडा बाबत खूप जागृती निर्माण झाली आहे स्वतः पालक लक्ष देतात त्यामुळे तिथे खेळाडू घडत आहेत पुणे, मुंबई कोल्हापूर नंतर चौथा स्थानावर सोलापूरचे नाव येत आहे सोलापूर मध्ये अनेक खेळाडू आंतरराष्ट्रीय व ऑलम्पिक स्पर्धेत चांगली कामगिरी केली आहे. सोलापुरात थोडी मरगळ आली आहे आता पुन्हा सोलापूर मध्ये खेळासाठी चांगले दिवस येतील अशी अपेक्षा त्यांनी केली.प्रमोद कुनगुलवार सूंत्रसंचालन केले तर आभार प्रा डॉ शैलेश बंडे यांनी मानले.

## क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

✔ **सोलापूर** : क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या २२८व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे, अशी माहिती उत्सव अध्यक्ष अतिश पाटोळे यांनी गुरूवारी



पत्रकार परिषदेत दिली. क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे मध्यवर्ती जयंती महोत्सव मंडळाच्यावतीने १३ ते १७ नोव्हेंबर दरम्यान विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. १३ नोव्हेंबर रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालय, उत्तर सदर बजार, लष्कर येथे सकाळी ९ ते दुपारी १ दरम्यान डॉ. नवनीत तोष्णीवाल यांच्या सहकार्याने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रीया शिबिर होईल. १४ नोव्हेंबर रोजी अण्णाभाऊ साठे पूर्णाकृती पुतळा, भैय्या चौक येथे क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे यांना अभिवादन आणि प्रबोधन गीतांचा कार्यक्रम होणार आहे. १५ नोव्हेंबर रोजी विविध वस्त्यांमध्ये शालेय साहित्य वाटप, १६ नोव्हेंबर रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालय, उत्तर सदर बजार, लष्कर येथे सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत ई-श्रम कार्ड शिबिर, १७ नोव्हेंबर रोजी महात्मा फुले गृहनिर्माण संस्था, मोदी येथे कचरा वर्गीकरणाचे बकेट वाटप आदी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. तरी या जयंती महोत्सवात सर्व बाधंवांनी सहभागी होण्याचे आवाहन यावेळी आयोजकांनी केले. या पत्रकार परिषदेस महोत्सव मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटोळे, अतिश पाटोळे, प्रा. सोमनाथ साबळे आदी उपस्थित होते.

## आझाद सोशल फाऊंडेशनचे समाजरत्न पुरस्कार जाहीर

✔ **सोलापूर** : देशाचे पहिले शिक्षणमंत्री भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझा यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारे आझाद सोशल फाऊंडेशनचे 'समाजरत्न पुरस्कार' जाहिर झाल्याची माहिती अध्यक्ष जावीद खैरदी यांनी पत्रकार परिषदेत गुरूवारी दिली. समाजरत्न पुरस्काराचे वितरण डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजता होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुफ्ती सय्यद अमजद अली काझी असतील. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. मिलींद थोबडे, काँग्रसचे शहराध्यक्ष प्रकाश वाले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष भारत जाधव, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पुरूषोत्तम बरडे, हाजी फारूक शाब्दी यांची उपस्थिती असेल. सोलापूरात शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक क्षैत्रात उल्लेखनिय काम करणाऱ्या ११ जणांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. यामध्ये जमियेत उलमाए हिंद, डॉ. फहिम गोलिवाले, प्राचार्य अ. जब्बार शेख, महेबुबसाब अ. गनी निटोरे, हैदर सलीम शेख, महेजबीन नवाब, सोहेल पिरसाब पटेल, मोहम्मद इकबाल गुलाब शेख, मंजुर शहाबोद्दीन शेख, सिकंदर याकुब बागवान, अबु रेहान शब्बीर तांबोळी यांना सोलापूर समाजरत्न पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

## ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉकमुळे सोलापूर विभागातून धावणाऱ्या मेल एक्सप्रेस रद्द

✔ सुराज्य/सोलापूर

मुंबई विभागात ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉकमुळे सोलापूर विभागातून धावणाऱ्या मेल एक्सप्रेस गाड्या रद्द केल्या आहेत, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने गुरूवारी दिली.

मध्य रेल्वेतील मुंबई विभागात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मस्जीद दरम्यान अप लाइन आणि डाऊन लाइन, अप आणि डाऊन थ्रू लाइन्स वरील आरओबी तोडण्याच्या कामा करिता १९ आणि २० नोव्हेंबर २०२२ रोजी ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे सोलापूर विभागातून धावणाऱ्या मेल एक्सप्रेस गाड्या रद्द करण्यात येणार आहेत. यामध्ये १९ नोव्हेंबर रोजी हैदराबाद - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस रद्द, चेन्नई सेंट्रल - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस दादर स्थानकापर्यन्त धावेल, हैदराबाद - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस दादर स्थानकापर्यन्त धावेल, गदग - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस पुणे स्थानकापर्यन्त धावेल, सोलापूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस पुणे स्थानकापर्यन्त धावेल, तिरुअनंतपुरम - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्सप्रेस पुणे स्थानकापर्यंत धावेल तसेच २० नोव्हेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - हैदराबाद एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे. तरी रेल्वे प्रवाशांनी याची नोंद घ्यावी व आपला प्रवास निश्चित करावा, असे आवाहन रेल्वे विभागाकडून करण्यात आले आहे.



## रॉडने डोके फोडले

✔ **सोलापूर** : लहान मुलास कुत्रा चावल्याचे सांगण्यास गेल्यानंतर चौघांनी मिळून रॉडने मारहाण करून जखमी केल्याची घटना करकंब (ता.पंढरपूर) येथे मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. अमित सुरेश शिंदे (वय ३५ रा.करकंब) असे जखमीचे नाव आहे. सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या घराजवळ राहणाऱ्याचा कुत्रा अमित शिंदे यांच्या मुलास चावला होता. ते सांगण्यासाठी त्यांनी घरी गेले होते. त्यावेळी जयंत दासू शिंदे आणि अन्य तियांनी त्यांना लोखंडी रॉड आणि हाताने मारहाण केली. त्याच त्यांच्या डोके आणि पायाला जखम झाली. अशी नोंद तालुका पोलीस झाली आहे.

## अपंगांच्या विविध मागण्यांसाठी बेमुदत उपोषण

✔ सुराज्य/सोलापूर

केंद्र आणि राज्य शासनाने अपंग बांधवांसाठी विविध योजनांमध्ये सवलत दिली आहे. परंतु अनेक योजनांचा लाभ अपंग बांधवांना दिला जात नाही. त्यामुळे अपंगांच्या विविध मागण्यांसाठी बेमुदत उपोषण करणार असल्याची माहिती प्रहार अपंग क्रांती संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सिद्राया माळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेत माळी म्हणाले, शहरातील गृहनिर्माण संस्थां ५ टक्के घरकुल आरक्षित ठेवत नाहीत. त्या गृहनिर्माण संस्थेचे शासकीय अनुदान बंद आणि गृहनिर्माण परवाना रद्द करावा. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दिव्यांगांना ५ टक्के निधी व गाळा वाटप करणे, शहर-जिल्ह्यातील दिव्यांगांना बीपीएल रेशनकार्ड मिळावे, महापालिकेत दिव्यांगांसाठी झालेल्या ठरावांची अंमलबजावणी करावी, शहरातील दिव्यांगांची ५ टक्के घरपट्टी माफ करावी आदी मागण्या आहेत. यामध्ये दिव्यांगांना लाभ दिला जात नाही.

त्यामुळे सदरच्या मागण्यांसाठी जिल्हा परिषद कार्यालय, पूनम गेट येथे येत्या १४ नोव्हेंबरपासून बेमुदत उपोषणास सुरवात करण्यात येणार आहे.

## लव्हे येथे सख्या भावास मारहाण; तिघांवर गुन्हा


✔ **माढा** : तालुक्यातील लव्हे येथे घर जागेच्या वादातून सख्या भावास कुऱ्हाडीचा तुंबा आणि लाथा बुक्याने मारहाण करून जखमी करण्यात आले. ही घटना काल बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

या संदर्भात जखमी झालेले बाबासाहेब मनोहर लोहार (वय ४० रा.लव्हे) यांनी कुर्डूवाडी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलीसांनी त्यांचा भाऊ हंबीरराव लोहार, त्याची पत्नी आशाबाई आणि मुलगा नागनाथ लोहार या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. काल सायंकाळच्या सुमारास त्यांचा भाऊ हंबीरराव हा त्यांच्या घरासमोरील अंगण खोदत होता. त्या संदर्भात त्यांनी जाब विचारले असता नागनाथ याने उलट्या कुऱ्हाडीने त्यांना मारहाण केली. तर भावाने लाथाबुक्क्या तर भावजयेने त्यांच्या पत्नीस चापटाने मारून जखमी केले. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार घाडगे पुढील तपास करीत आहेत.

## महाराष्ट्राच्या पुरुष महिला खो-खो संघात सोलापूरच्या रामजी कश्यप व प्रिती काळेंची निवड

✔ **सोलापूर** : उस्मानाबाद येथे २० ते २४ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या ५५ व्या पुरुष-महिला राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे दोन्ही संघ जाहिर केले आहे. राज्य संघटनेचे सचिव ॲड. गोविंद शर्मा यांनी जाहीर केलेल्या महाराष्ट्राच्या पुरूष व महिला खो-खो संघात सोलापूरच्या रामजी कश्यप (वेळापूर) व प्रिती काळे यांची निवड झाली आहे.

या संघाचे सराव शिबिर उस्मानाबाद येथे खो-खो फेडरेशनचे सहसचिव डॉ. चंद्रजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी सुरु होईल. हिंगोली येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी पुरुष-महिला खो-खो स्पर्धेतून नागनाथ गजमल, प्रशांत देवळेकर, संदेश आंब्रे व सुप्रिया गाढवे या निवड समिती सदस्यांनी निवडले.




**पुरुष संघ** : अनिकेत पोटे, निहार दुबळे, अक्षय भांगरे, ऋषिकेश मुर्चावडे (सर्व मुंबई उपनगर), प्रतिक वाईकर, सुयश गरगटे, आदित्य गणपुले (सर्व पुणे), लक्ष्मण गवस, गजानन शेंगाळ (सर्व ठाणे), सुरज लांडे, अक्षय मासाळ (सर्व सांगली), रामजी कश्यप (सोलापूर), दिलीप खांडवी (नाशिक), सुरज शिंदे (हिंगोली) आणि सनी नायकवडी (उस्मानाबाद). **राखीव खेळाडू** : ऋषभ वाघ (पुणे), अनिकेत चेंदवणकर (मुंबई उपनगर), वेदांत देसाई (मुंबई). प्रशिक्षक : शिरीन गोडबोले (पुणे), व्यवस्थापक : नरेंद्र रायलवार (हिंगोली), फिजीओ : डॉ. किरण वाघ (अहमदनगर). **महिला संघ** : प्रियांका इंगळे, काजल भोर, स्नेहल जाधव, दिपाली राठोड (सर्व पुणे), रुपाली बडे, पूजा फरगडे, रेश्मा राठाडे (सर्व ठाणे), संपदा मोरे, अश्विनी शिंदे, गौरी शिंदे (सर्व उस्मानाबाद), अपेक्षा सुतार, श्रेया सनगरे, आरती कांबळे (सर्व रत्नागिरी), प्रतिक्षा बिराजदार (सांगली), प्रिती काळे (सोलापूर). **राखीव खेळाडू** : सोनाली पवार (नाशिक), किरण शिंदे (उस्मानाबाद), स्नेहल चव्हाण (सांगली). प्रशिक्षक : प्रविण बागल (उस्मानाबाद), व्यवस्थापिका : माधुरी कोळी (ठाणे), सहाय्यक प्रशिक्षक : प्राची वाईकर (पुणे).

## तुमच्या मुलीला घटस्फोट देऊन मारून टाकणार; अशी धमकी दिल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : तुमच्या मुलीला घटस्फोट देऊन मारून टाकणार अशी धमकी देऊन विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देऊन छळ केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी शितल मनोज इंगळे (वय-३२, रा.मिलिंद नगर,बुधवार पेठ, सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती मनोज भिमराव इंगळे, नणंद सुरेखा नागनाथ गायकवाड (पतीच्या आत्याची सून) शारदा शंकर गायकवाड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



ऑक्टोबर २०२२ मध्ये पतीच्या आत्याची सून शारदा गायकवाड यांचा फोन पती मनोज इंगळे यांना आला. त्यावेळी फिर्यादी यांच्या पतीने फिर्यादी व मुलांना मारहाण करून घराबाहेर काढले.तेव्हा फिर्यादी घराबाहेर बसल्यानंतर त्या माहेरी गेल्या. दुसऱ्या दिवशी फिर्यादी यांचे आई-वडील समजावण्यासाठी आले असता, पती मनोज इंगळे यांनी त्यांना मारहाण करून हाकलून दिले.

त्यानंतर तुमच्या मुलीला घटस्फोट देऊन मारून टाकणार अशी धमकी दिली.दरम्यान मागील दहा वर्षापासून वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांना शारीरिक व मानसिक त्रास देऊन दुसऱ्या मुली सोबत अश्लील कृत्य करून पैशाची मागणी करत फिर्यादी व त्याच्या मुलाचा सांभाळ न करता तिला त्रास देऊन जाचहाट केला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास पोह.कटारे हे करीत आहेत.

## फोनवर बोलताना तरुणाचा मोबाईल हिसकावला

✔ **सोलापूर** : मित्राचा फोन आल्यानंतर फोनवर बोलत पायी चालत जात असताना दुचाकी वरील आलेल्या इसमानी तरुणाचा मोबाईल जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेला आहे.हि घटना दि.८ नोव्हेंबर रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास शिवदारे कॉलेजच्या कॉर्नर जवळ घडली.

याप्रकरणी आदित्य मुकुंद गिरी (वय-२५,रा.ए,दोन्दे नगर, जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून दोन दुचाकीवरून आलेल्या अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फोनवर बोलून झाल्यानंतर आदित्य हा खिशात मोबाईल ठेवत असताना पाठीमागून अचानक आलेल्या दोन अनोळखी इसमांनी आदित्य याच्या हातातील मोबाईल इसका मारून जबरदस्तीने चोरून नेला आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.

### महापालिका आयुक्तांचा सुखद धक्का!

## ८ कर्मचाऱ्यांना पदोन्नती; जीएडीचे गाडेकर यांची कर विभागाकडे

✔ सुराज्य/सोलापूर

महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी ८ कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचा सुखद धक्का दिला. ४ वरिष्ठ मुख्य लेखनिकांना कार्यालय अधीक्षकपदी तर ४ जणांना वरिष्ठ मुख्य लेखनिकपदी पदोन्नती दिली आहे.जीएडीचे युवराज गाडेकर यांची मालमत्ता कर विभागाकडे कार्यालय अधीक्षकपदी पदोन्नतीने बदली केली आहे. टायपिंग परीक्षेत नापस झालेल्या लिपिकांची पदोन्नतीत संधी हुकली आहे. टायपिंग परीक्षा पास झाल्यानंतरच अन्य पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळणार आहे. महापालिकेच्या खातेनिहाय पदोन्नती समितीत अखेर पदोन्नतीवर शिक्कामोर्तब करण्यात आला.

गेल्या अडीच वर्षापासून खोळंबलेली सोलापूर महापालिका खातेनिहाय पदोन्नती समितीची बैठक होऊन १८ ऑक्टोबर २०२२ रोजी कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा निर्णय घेण्यात आला. त्या पदोन्नतीच्या मान्यतेचे आदेश अखेर महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी काढले आहेत. उशिरा का होईना पदोन्नती झाल्याने आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र जे लिपिक टायपिंग परीक्षा नापास झालेत त्यांची पदोन्नतीची संधी यंदा हुकली आहे. पुढील टायपिंगच्या परीक्षेत ते उत्तीर्ण झाल्यानंतरच त्यांना पदोन्नती मिळू शकणार आहे.

यांची झाली कार्यालय अधीक्षकपदावर पदोन्नती : मुख्य लेखापाल कार्यालयातील श्रीमती रोहिणी साळुंके यांची खुला - मुख्या लेखापाल कार्यालयात, नगरसचिव कार्यालयातील प्रभाकर गणपा यांची इतर मागासवर्ग - मंडई विभाग/ काम -भूमी व मालमत्ता विभागात सामान्य प्रशासन विभागातील युवराज गाडेकर यांची मालमत्ता कर विभागात तर कामगार कल्याण विभागाकडील विनोद कुलकर्णी यांची मालमत्ता कर विभाग - गवसु विभागात बदली करण्यात आली आहे. तसेच वरिष्ठ श्रेणी लिपिक पदी कार्यरत कर्मचाऱ्यांना वरिष्ठ मुख्य लेखनिक पदावर पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आली आहे यामध्ये आरोग्य कार्यालयाकडील श्रीमती आशा भास्कर यांची स्थानिक संस्था कर विभागात, मालमत्ता कर विभागातील रश्मी दिवाण यांची मालमत्ता कर विभागात, सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागातील कस्तुराबाई चौगुले यांची दिव्यांग अ.व्यं कामगार कल्याण व जनता संपर्क कार्यालयात तर मुख्य लेखापाल कार्यालयाकडील रजाक पेंढारी यांची दिव्यांग- कर्णबधिर - मुख्य लेखापाल कार्यालयात बदली केली आहे.

वरिष्ठ मुख्य लेखनिक पदावरून कार्यालयीन अधीक्षकपदी पदोन्नती प्रक्रियेमध्ये दोन जण अपात्र, एक कर्मचाऱ्यांचा सीआर खराब असे १३ पैकी ११ उपलब्ध कर्मचाऱ्यांमधून चार जणांना पदोन्नती देण्यात आली. तसेच मुख्य लेखनिक पदी पदोन्नतीमध्ये एकूण ४९ पैकी तीन जणांचे सीआर खराब तर उपलब्ध ४५ पैकी चार कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. टायपिंग परीक्षेत नापास झालेल्यांना पदोन्नती नाकारण्यात आली आहे. टायपिंग परीक्षा नापास झाल्याने कार्यालयीन अधीक्षक पदासाठी ७ कर्मचारी तर मुख्य लेखनिक पदासाठी ४१ असे एकूण ४८ जणांची पदोन्नतीची संधी हुकली आहे.

### २६ नोव्हेंबरला टायपिंग परीक्षा

येत्या २६ नोव्हेंबर २०२२ रोजी महापालिकेतील लिपिकांसाठी पुन्हा टायपिंग परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यास संबंधित पात्र लिपिकांचा पदोन्नतीचा मार्ग मोकळा होणार आहे.



## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची अकलूज घोडेबाजाराला अभ्यास भेट

**अकलूज :** शंकरराव मोहिते महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग व वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनची अभ्यासक्रमांतर्गत अकलूजच्या शंकरराव मोहिते-पाटील कृषी उत्पन्न बाजार समितीने आयोजित केलेल्या घोडेबाजारास भेट देण्यात आली.या उपक्रमात महाविद्यालयातील एकूण १४३ विद्यार्थी व विद्यार्थींनी सहभाग नोंदविला होता. त्यांना घोड्यांच्या विविध प्रकारच्या प्रजाती, खरेदी-विक्री व किंमती संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली. यावर्षी घोडेबाजारचे लक्ष वेधून घेतले ते ५१ लाख रुपयाच्या किंमतीच्या सलमान नावाच्या पंजाबी घोड्याने.

हिंदुस्थान चॅम्पियन असलेल्या हत्ती घोड्याचे पिल्लू, ७० इंच उंचीचा, देखणा, पांढरा शुभ्र, जन्मतः डोळ्यांना काजळ, तोंडाला तीळ,गळयाला देवमन (बोहरा) वयाने २ वर्षाचा हा घोडा लोकांना भुरळ घालत आहे. दरवर्षी दीपावली पाडव्याला शुभारंभ होऊन साधारणपणे एक ते दीड महिन्यापर्यंत घोडेबाजार चालतो. कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत या कालावधीमध्ये औषध सुविधा, वीजपुरवठा, पाणी, नैसर्गिक वातावरणातील जागा, सुरक्षा सर्व मोफत दिल्या जातात. या उपक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव राजेंद्र काकडे, शिवराज माने-पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे, कार्यालयीन अधीक्षक युवराज मालसुरे यांचे मार्गदर्शन लाभले. वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रत्नदीप गायकवाड, डॉ. भगवानराव साळुंखे, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. अण्णासाहेब नलवडे यांचेही मार्गदर्शन मिळाले. या घोडेबाजार भेटीस अर्थशास्त्र विभागाच्या डॉ. पल्लवी मिसाळ, प्रा. शिवाजी राजगुरू, प्रा. नितीन साळुंखे, वाणिज्य विभागाचे प्रा. धीरज गुरव, प्रा. गणेश धायगुडे, प्रा. विनायक माने उपस्थित होते.



## विवेकवर्धिनीमध्ये 'विद्यार्थी दिवस' साजरा

**सोलापूर :** श्री दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ पंढरपूर संचलित, विवेक वर्धिनी विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिवस विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे प्राचार्य राजेंद्र पाराध्ये होते. त्यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकरांच्या बालपणीच्या शैक्षणिक जीवनातील काही प्रसंग सांगितले व विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा असे सांगितले. प्रास्ताविक बाबासाहेब सिरसट यांनी केले. यावेळी पर्यवेक्षक सुनील पाटील, वसतिगृह अधीक्षक अमोल हुंगे, नितीन कदम, रूपाली भुसे, बाळासाहेब करपे, दिलीप रानगट्टे, प्रेम खेडकर, मगण सुळे, बबन कोकतरे, आनंद पोटे तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या समवेत हा कार्यक्रम पार पडला. उपस्थितांचे आभार साजिद मुलाणी यांनी मानले.

## पोलीस उपायुक्त डॉ.दिपाली काळे यांनी स्वीकारला पदभार

**सोलापूर :** सोलापूर पोलीस आयुक्तालयात उपायुक्त पदावर नव्याने रुजू झालेल्या डॉ.दिपाली काळे यांच्याकडे गुन्हे शाखा आणि विशेष शाखेची जबाबदारी देण्यात आली आहे. उपायुक्त दिपाली काळे गुरुवारी पोलीस आयुक्तालयात दाखल झाल्या.पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी उपायुक्त डॉ.दिपाली काळे यांच्याकडे गुन्हे शाखा आणि विशेष शाखेची जबाबदारी सोपविली आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी डॉ.दिपाली काळे यांचे स्वागत केले.गुन्हे शाखा उपायुक्त पदावर गेल्या ४ वर्षापासून कार्यरत असलेल्या बापू बांगर यांची सातारा येथे अपर पोलीस अधीक्षक पदावर बदली झाली आहे.यापूर्वी महिला पोलीस अधिकारी म्हणून पौर्णिमा चौगुले यांनी गुन्हे शाखेची जबाबदारी सांभाळली होती. डॉ.दिपाली काळे यांनी यापूर्वी सांगली येथे पोलीस उपाधीक्षक पदावर,त्यानंतर सोलापुरात सहाय्यक पोलीस आयुक्त पदावर जबाबदारी सांभाळली आहे.सोलापूर येथून त्यांची अहमदनगर येथे अपर पोलीस अधीक्षक पदावर बदली झाली होती.त्यानंतर त्यांची नाशिक येथे महाराष्ट्र पोलीस अकादमीमध्ये पोलीस अधीक्षक पदावर नियुक्ती झाली होती.नाशिक येथून आता त्या सोलापूरला आल्या आहेत.त्यांना साहित्य,संस्कृती आणि चित्रपट विषयक विशेष आवड आहे.

## ॲमेझॉन पे फॉर बिजनेस ॲपची सुरूवात

**सोलापूर :** ॲमेझॉन पे ने आपल्या 'अब हर दिन हुआ आसान' या डिजिटल मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याचे अनावरण केले ज्याद्वारे डिजिटल पेमेंट देशभरातील लाखो व्यापाऱ्यांचे जीवन सुलभ करते.ॲमेझॉन पे फॉर बिजनेस ॲपची सुरूवात झाल्यापासून ५० लाखांहून अधिक व्यापाऱ्यांनी आता साइन अप केले आहे.विकास बंसल म्हणाले,प्रत्येक भारतीयाची देयके आणि आर्थिक गरजा सोडवून जीवन सुलभ करणे आणि आकांक्षा पूर्ण करणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

SHRI VITHAL EDUCATION & RESEARCH INSTITUTE's
**COLLEGE OF ENGINEERING, PANDHARPUR**
Gopalpur-Ranjani Road, Gopalpur, Pandharpur-413 304 Dist:- Solapur (Maharashtra) **Mob. No.-9545553888** (Approved by AICTE, New Delhi and Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur) **NBA Accredited all eligible UG Courses, NAAC A+ (3.46/4.00 CGPA) Accredited and TCS Accredited, ISO 9001:2015 Certified Institute.**
**Email:-coe@sveri.ac.in Website: www.sveri.ac.in**
SVERI
**ADMISSIONS: 2022-23**
For admission to various branches of **M.Tech.** in our Institute against-
**Institute Level Seats & Vacancies, if any, after CAP ROUNDS**
Interested candidates seeking admission shall contact to office along with necessary documents. For details of courses, seats available and schedule, please visit our website and Institute Notice Board from time to time.
**Date-11/11/2022** **(Dr. B.P.Ronge) PRINCIPAL**



बार्शी येथे आयोजित कृषी महोत्सवात 'लहरी हवामान' या विषयावर बोलताना पंजाबराव डख, उपसभापती झुंबरदादा जाधव, चंद्रकांत मांजरे, सचिव तुकाराम जगदाळे आदी.

# शेतकऱ्यांनी हवामान बदलाबाबत जागरूक राहावे : पंजाबराव डख

सुराज्य/बार्शी

सातत्याने निसर्गात होणारे चढउतार व हवामानातील बदलांबाबत जागरूक राहिल्यास नैसर्गिक आपत्तींना तोंड देवुन संभाव्य पिकांचे नुकसान शेतकरी टाळू शकतील, असे मत हवामान बदलांचे अभ्यासक पंजाबराव डख यांनी व्यक्त केले. येथील उच्चतम कृषि उत्पन्न बाजार समितीच्यावतीने अमृत महोत्सवी वाटचालीनिमित्त आयोजित केलेल्या ५ दिवसीय राज्यस्तरीय भव्य भगवंत कृषी महोत्सवामध्ये 'लहरी हवामान' या विषयावर ते बोलत होते.

यावेळी बाजार समितीचे उपसभापती झुंबरदादा जाधव, चंद्रकांत मांजरे, प्रा. तात्यासाहेब घावटे आदी उपस्थित होते. बाजार समितीने शेती, अवजारे, रसायने, गृहोपयोगी वस्तु, खाद्य पदार्थ, शेती संबंधित विविध प्रात्याक्षिके, मनोरंजन साहित्य, वैशिष्ट्यपूर्ण पशुधन यांचा समावेश असलेल्या भरगच्च कृषी प्रदर्शनात शेतकऱ्यांचे प्रबोधन व्हावे तसेच त्यांच्या जिव्हाळयाच्या 'हवामान बदल' विषयाबाबत माहिती मिळाली. त्यासाठी आयोजित केलेल्या या व्याख्यानात डख म्हणाले, 'मी सतत शेतीमध्ये रमलो आहे, बालपणापासून मला निसर्गाच्या निरिक्षणाची सवय आहे. या अभ्यासाला मी शास्त्रीय माहितीची जोड दिली. त्यामुळे मला हवामानातील आगामी चढउतार तसेच संभाव्य पावसाची पूर्वकल्पना येते. प्रत्येक शेतकऱ्याने आपली निरीक्षण शक्ती वाढवली व हवामान बदलांबाबत जागरूकता दर्शविली तर आपल्याला पावसाची पूर्वकल्पना मिळू शकते. तसेच होणारे नुकसान टाळण्याबाबत पूर्व योजना करता येते. मी व्यक्त केलेले हवामान बदलाचे अंदाज खरे ठरतात, याची प्रचिती राज्याला येत आहे. मे महिन्यामध्ये २ ते १० या तारखेदरम्यान सातत्याने वारे वाहिल्यास १ महिन्याने म्हणजे जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस पडणार असा अंदाज करता येतो. तसेच जर आपल्या भागात पाउस पडत असेल आणि जवळपास २ कि.मी. च्या अंतरापुढे पाउस पडत नसेल तर तेथे भविष्यात पाउस पडणार नाही असा अंदाज व्यक्त करता येतो. पावसाचा अंदाज बांधताना डख यांनी जर आपल्या भागातून विमान आकाशात भ्रमंती करत असेल आणि जोरात आवाज येत असेल तर आकाशात बाष्पीभवनाचे ढग आहेत हे लक्षात येते.

आगामी १३, १४, १५ नोव्हेंबर दरम्यान पुणे, सांगली, सातारा जिल्ह्यात पावसाची शक्यता डख यांनी वर्तवली. मात्र, सोलापूर जिल्ह्यात केवळ ढगाळ वातावरण राहील असे ते म्हणाले. येत्या महिनाभरात आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिलनाडू या राज्यात पाऊस होण्याची शक्यता आहे, असेही ते म्हणाले.

गावरान आंबे, शेवगा, चिंच या झाडांना फुलोरा आला असेल तर पाऊस पडण्याची शक्यता असते असे ते म्हणाले. तसेच पाऊस येण्याचा अंदाज पशु-पक्ष्यांना, प्राण्यांना येतो. चिमणीपासून ते सरड्यापर्यंत अनेक प्राण्यांच्या वर्तनात झालेले बदल टिपल्यास पावसाचे अंदाज बांधता येतात असे ते म्हणाले.

हवामानात होणारा बदलांचे शेतीबरोबरच मनुष्याच्या शरीरावरही परिणाम होत असतात. पावसाळयामध्ये वातावरणातील आर्द्रता वाढते त्यामुळे हवेतील ऑक्सिजन कमी होतो. त्यामुळे दमा, अस्थमा व श्वसनाचे विकार असलेल्या व्यक्तिंना त्रास होतो. अशा वातावरणात पाउस पडण्याची शक्यता असते असेही डख म्हणाले.

यावेळी डख यांनी आपण स्वत: ३ एकर जमीनीमध्ये ८७ क्विंटल उत्पादन घेतलेले आहे. त्यामुळे आपण सोयाबीन, तूर या पिकांबाबत अधिकारवाणीने मार्गदर्शन करू शकतो असे सांगत परभणी, राहुरी व विविध कृषी विद्यापिठांनी प्रमाणित केलेल्या बियाण्यांच्या जातीच शेतकऱ्याने वापरव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

पिकांवर होणाऱ्या विविध किड व जंतु, संसर्गाबाबतही डख यांनी विविध दक्षतेचे उपाय सांगितले. शेतकऱ्यांनी विचारलेल्या विविध शंकाचे निरसनही डख यांनी यावेळी केले. एका हाडाच्या शेतकऱ्यांनी आपल्या निर्सगातील निरीक्षण व अस्सल अनुभवावर आधारीत मांडलेल्या व्याख्यानाला शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन मंगेश दहींहांडे व अर्पणा दळवी यांनी केले.



## प्रदर्शनात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती : विखे-पाटील

### भगवंत कृषी महोत्सवाचे शानदार उद्घाटन

सुराज्य/बार्शी

**शेतकऱ्यांनी केवळ पारंपारीक शेतीवर अवलंबून राहू नये, बार्शीतील भगवंत कृषी महोत्सवासारख्या प्रदर्शनातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी, असे आवाहन राज्याचे महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले.**

उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने आयोजित भगवंत कृषी महोत्सवाच्या ऑनलाईन उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते. यावेळी आमदार राजेंद्र राऊत, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, जिल्हा उपनिबंधक कुंदन भोळे, जिल्हा कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे, सभापती रणवीर राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रास्ताविकामध्ये सभापती राऊत म्हणाले, 'गेल्या सव्वा चार वर्षात बाजार समितीच्या माध्यमातून ३२ कोटींची विकास कामे झाली आहेत तर इनाम योजनेत बाजार समिती ५ व्या क्रमांकावर आहे. त्याचप्रमाणे शेती माल तारण कर्ज योजनेतून शेतकऱ्यांना २ कोटींचे कर्ज वाटप झालेले आहे.

यावेळी आमदार राऊत म्हणाले, 'उपसा सिंचन योजनेच्या पूर्णत्वासाठी प्रयत्नशील आहे. शेतकरी, व्यापाऱ्यांना सुलभ दरात कर्ज उपलब्ध करून देत आहे सोयाबीन प्रक्रिया सारखे उद्योग होत आहेत. शेतकऱ्यांना अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईचे अनुदान मिळावेत यासाठी प्रयत्न केले. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना हमीभाव दिला. बाजार समितीचे उत्पन्न वाढवून विकास कामे केली. यावेळी जिल्हाधिकारी शंभरकर यांनी बार्शीसारख्या निमशहरी ग्रामीण भागात शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती देणारे प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल बाजार समिती कौतुकास पात्र आहे असे गौरवोद्गार काढले.

यावेळी जिल्हा कृषी अधिकारी शिंदे यांनी आपला जिल्हा सारख उत्पादन, द्राक्षबागा, दाळी व निर्यातक्षम केळी पिकविण्यात आघाडीवर असल्याचे सांगितले. यावेळी भगवंत कृषी पुरस्कार देऊन व्यापारी दिलीप गांधी, संतोष लोंढे, तुकाराम माने, राजकुमार गावसाने, मनोहर सोमाणी, राहुल शिंदे यांचा तसेच मुनीम गणेश शिंदे, सतीश वाघ, हमाल, तोलार शिवाजी साळुंखे, धनंजय वाघ यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती अनिल डिसले, बाजार समितीचे उपसभापती झुंबर जाधव, संचालक रावसाहेब मनगिरे व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रताप क्रीडा मंडळाच्यावतीने बालक्रीडा स्पर्धा

सुराज्य/अकलूज

कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या शंकरनगर-अकलूज येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने रविवार दि. १३ रोजी बालक्रीडा स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती प्रताप क्रीडा मंडळाच्या विद्यमान अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते - पाटील यांनी दिली.



विजयसिंह मोहिते - पाटील क्रीडा संकुल येथे रविवार दि. १३ नोव्हेंबर २०२२ रोजी या स्पर्धा संपन्न होणार आहेत. बालमुलांच्या आंतरिक गुणांना व कौशल्यांना विकसित करण्यासाठी, त्यांच्यामध्ये बालवयातच खेळाप्रति आवड निर्माण व्हावी, त्यांची शारीरिक तंदुरुस्ती व वाढ व्हावी यासाठी सदर स्पर्धेचे आयोजन केले आहे.

प्रताप क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह शंकरराव मोहिते - पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाने बुद्धिबळ स्पर्धा, रक्तदान शिबिर, अनिवासी क्रीडा सराव शिबिर, आट्यापाट्या स्पर्धा, नियमित सराव शिबिर, ना नफा ना तोटा तत्त्वावरील रत्नाई मिठाई वाटप, त्रिमूर्ती केसरी स्पर्धा यासोबत विविध स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले आहे तर मागील काळात प्रताप क्रीडा मंडळाने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धे चेही आयोजन करून देशपातळीवर लौकीक प्राप्त केला आहे.

या बालक्रीडा स्पर्धेचे उद्घाटन दि. १३ रोजी सकाळी १० वा. जिजामाता कन्या प्रशालेच्या सभापती सुलक्षणादेवी मोहिते - पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी प्रताप क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते - पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत.प्रत्येक गटासाठी स्वतंत्र आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली असून प्रत्येक स्पर्धकास सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे तर मंडळाच्यावतीने खेळाडूंना खाऊवाटप ही करण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या ठिकाणी स्पर्धकांना ने-आण करण्याची जबाबदारी पालकांची राहणार असून स्पर्धेपूर्वी १ तास अगोदर मैदानावर स्पर्धकांनी उपस्थित राहण्याचे स्पर्धा प्रमुख शिवाजी पारसे यांनी सांगितले.

## सत्तार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी राष्ट्रवादीचे निवेदन

सुराज्य/वेळापूर



बारामती लोकसभेच्या खासदार, संसदरत्न सुप्रिया सुळे यांच्याबद्दल अपशब्द वापरल्याच्या निषेधार्थ अब्दुल सत्तार यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा यासाठी वेळापूर पोलीस स्टेशनला निवेदन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, सामाजिक न्याय विभाग माळशिरस तालुका यांच्यावतीने देण्यात आले.

लोकसभेच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या बद्दल अपशब्द वापरल्याचे निषेधार्थ माळशिरस तालुक्याच्या वतीने त्यांच्यावरती गुन्हा दाखल करावा व योग्य ती कारवाई करावी अशी मागणी यावेळेस करण्यात आली अन्यथा पुढील काळात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर व राष्ट्रवादी कॉंग्रेस सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. धनंजय साठे यांच्या मार्गदर्शनाखाली तीव्र असे आंदोलन केले जाईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

यावेळी राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष रजनीश बनसोडे, अमोल पनासे, शहराध्यक्ष विठ्ठल माने, वैभव बनसोडे, सागर बनसोडे, गणेश गालफाडे, अण्णा कोडक, सुयोग बनसोडे, रॉक उबाळे उपस्थित होते.

## शासनाच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत : न्या. औटी



सुराज्य/सोलापूर

सकल भारत जनजागृती अभियान अंतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने महाशिबीराने आयोजित करण्यात आला आहे. या महाशिबीरामध्ये शासकीय विविध कार्यालयाचे स्टॉल मांडण्यात आले आहेत. तरी सर्व नागरिकांनी यांचा लाभ घ्यावा. शासनाच्या विविध योजना या ग्रामीण भाग व तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, असे प्रतिपादन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष, डॉ. शब्बीर अहमद औटी यांनी केले.

जिल्हा न्यायालय आवार,सोलापूर येथे या महाशिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक शिरिष सरदेशपांडे, सार्वजनीक बांधकाम विभाग अधीक्षक अभियंता संजय माळी. बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. निलेश ठोकडे, तसेच जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंग राजपूत उपस्थिती होते. सूत्रसंचालन सह. न्यायाधीश, एस. पी. पाटील यांनी केले. या शिबीरात न्यायीक अधिकारी वर्ग, शासकीय कर्मचारी अधिकारी जिल्हा वकिल संघ, जि.प मनपा, महिला व बालकल्याण उपप्रादेशिक कार्यालय, ग्रामीण पोलिस विभाग, महिला बचतगट, विविध बँकांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## एमआयडीसीसाठी जबरदस्तीने जमीन घेणार नाही : आ. देशमुख

### उताऱ्यावरील नाव निश्चित कमी करू ; आंदोलन थांबवा

सुराज्य/द. सोलापूर

**दक्षिण सोलापूर मंद्रूपच्या नियोजित एमआयडीसीला जमीन देण्यास विरोध असणाऱ्या शेतकऱ्यांची एक गुंठा ही जमीन जबरदस्तीने घेतली जाणार नाही, असे आश्वासन आमदार देशमुख यांनी दिले. मात्र उताऱ्यावरील नाव किती दिवसात कमी करता हे सांगा. त्यावर आमदार देशमुख यांनी ठोस आश्वासन न दिल्याने शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही.**

मंद्रुप येथील नियोजित एमआयडीसीसाठी जमीन देण्यास विरोध असणाऱ्या शेतकऱ्यांनी उताऱ्यावरील एमआयडीसी नाव कमी करावे. या मागणीसाठी ग्रामपंचायत कार्यालयासमोर गेल्या २१ सप्टेंबरपासून आंदोलन सुरू केले आहे. गुरुवारी आंदोलनाच्या ५० व्या दिवशी आमदार



देशमुख यांनी शेतकऱ्यांची भेट घेऊन संवाद साधला. आमदार देशमुख म्हणाले, मंद्रुप भागाचा विकास व्हावा, तरुणांना रोजगार मिळावा, यासाठी एमआयडीसी मंजूर करून घेतली. पण यासाठी जमीन देण्यास काही जणांचा विरोध आहे. ज्यांचा विरोध आहे त्यांची जमीन जबरदस्तीने घेतली जाणार नाही. उताऱ्यावरील एमआयडीसीची झालेली नोंद कमी करणे माझ्या हातात नाही. उद्योग व महसूल विभागाच्या बैठकीत त्यावर निर्णय होईल. त्यासाठी थोडा वेळ लागेल. पण उताऱ्यावरील नाव निश्चित कमी करू. तेव्हा आपण आंदोलन थांबवा.

#### तर मी राजकारण सोडेन

तुमच्या उताऱ्यावरील नाव कमी करण्याचे आश्वासन आमदार सुभाष देशमुख यांनी दिले आहे. त्यांनी दिलेला शब्द पाळला नाही तर मी राजकारण सोडून देईन. आमदार सुभाष देशमुख तुम्ही विश्वास ठेवा, असे आवाहन माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे यांनी शेतकऱ्यांना केले.

यावेळी माजी सभापती गुरुसिध्द म्हेत्रे, सरपंच कलावती खंदारे, सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, नायब तहसीलदार जितेंद्र मोरे, गौरीशंकर मेंडगुदले, शेतकरी महादेव गुरण्णा कुंभार, बाबू मेंडगुदले, आप्पाशा मेंडगुदले, मलकारी गुंजाटे, अनिल जोडमोटे, ओगसिध्द तड्डे, डॉ. मळसिद्ध कुंभार, महेश मेंडगुदले,अमोगसिद्ध जोडमोटे, मलकारी जोडमोटे, रेवणसिद्ध गुंजाटे, मलकारी कुंभार, नागनाथ शेंडगे, अमोगसिध्द काळे, चंद्रकांत काळे यांच्यासह बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते.

# सोलापूर जिल्ह्यातील आरोग्यसेवा सक्षम करण्यासाठी फडणवीसांकडे आ.मोहिते-पाटील यांचा पाठपुरावा

सुराज्य/अकलूज

**सोलापूर जिल्ह्यातील सध्या असलेल्या लोकसंख्येला आरोग्यसेवा देण्यासाठी ग्रामीण भागातील अस्तित्वात असलेली प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्राची यंत्रणा अपुरी पडत आहे, सोलापूर जिल्ह्य़ातील लोकसंख्येच्या व अंतराच्या निकषानुसार नवीन २२ आरोग्य केंद्रे व ६८ उपकेंद्राना मंजूरी मिळावी म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी मागणी केली आहे.**




प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे हे २४ तास सेवा देते. या द्वारे स्थानिक उद्भवणाऱ्या आजारांवर नियंत्रण मिळवणे, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, प्रयोग शाळेच्या सेवा पुरवणे, प्रसुतीपूर्व तपासणी, किरकोळ आजारांवर उपचार,माता आणि बाल आरोग्य सेवा, संशयीत क्षय, हिवताप, आणि कुष्ठरुग्णांची तपासणी, औषधोपचार आणि आरोग्य शिक्षण अशा आरोग्य सेवा पुरविल्या जातात.याचा अधिक फायदा सर्वसामान्य व गोर-गरीब जनतेला होण्याकरीता जिल्ह्यातील ग्रामीण भागात आरोग्यसेवांचे सक्षम जाळे उभारण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करत असल्याचे आ.मोहिते-पाटील यांनी सांगितले. सोलापूर जिल्ह्यामधे लोकसंख्येच्या व अंतराच्या निकषानुसार २२ प्राथमिक आरोग्य केंद्र व ६८ उपकेंद्राची गरज असलेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.



वाढत्या लोकसंख्येचा विचार केला असता. जिल्ह्यात सध्या अस्तित्वात असलेल्या प्राथमिक आरोग्य यंत्रणेवर परीणाम होतो, शासकीय आरोग्यसेवा घेऊ इच्छित असणाऱ्या लोकांना शासकीय यंत्रणेचा लाभ मिळण्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे. सन २०११ चे लोकसंख्येनुसार जिल्हा परिषद सोलापूर यांनी आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राचा आराखडा जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजूरी घेऊन दि. २५/१०/२०१९ रोजी सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडे मंजूरीसाठी सादर केलेला आहे. सदरचा आराखडा हा संबंधित विभागाकडे प्रलंबीत असून सदरची नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे झाल्यास जिल्ह्यातील गोर-गरीब जनतेला याचा लाभ घेता येईल. यासाठी सोबत जोडलेल्या आराखड्यानुसार जिल्ह्यातील २२ प्राथमिक आरोग्य केंद्र व ६८ उपकेंद्रास मंजूरी देणेबाबत संबंधितास आदेश व्हावेत अशी विनंती व मागणी आ.मोहिते-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे केली.



## पाथरी ग्रामपंचायतीला सीईओ स्वामी यांची भेट

**उत्तर सोलापूर** : उत्तर तालुक्यातील पाथरी येथे आमदार सुभाष देशमुख यांच्या आदेशानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी भेट दिली. पाथरी येथे जवळपास सव्वा कोटींचे उप प्राथमिक आरोग्य केंद्र बांधून देखील शासनाच्या निष्काळजीपणा व धूळखात पडून आहे.जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जास्त असून नवीन खोल्या मिळाव्यात यासाठी अनेकवेळा मागणी करून,प्रस्ताव देऊनही मंजुरी होत नाही.आरोग्य व शिक्षण विभागाच्या अधिकारी यांना संबधित प्रस्तावास गती देऊन त्वरित समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावा अस्यां सूचना देण्यात आल्या. जी- १ प्रस्ताव पाठवण्यात यावा.यावेळी गटशिक्षणाधिकारी बापूसाहेब जमादार, गटविकास अधिकारी जसमीन शेख, आरोग्य अधिकारी शेगर, उत्तर तालुका बांधकाम उपअभियंता दळवीं, अभियंता मंगरुळे, सरपंच लक्ष्मी मळगे, उपसरपंच श्रीमंत बंडगर, संजय वाघमोडे, उमेश पाटील, आनंद बंडगर, पंकज मसलखांब चंद्रकांत मारकड संतोष बंडगर विष्णु बंडगर ग्रामसेविका वाघमारे, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्रीपूर येथे आज मोतीबिंदू व नेत्र तपासणी शिबिर



**श्रीपूर** : श्रीपुर येथे भारतीय जनता पार्टी ट्रान्सपोर्ट सेल जिल्हाध्यक्ष व विद्यमान नगरसेवक निनाद प्रभाकर पटवर्धन व एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय महंमदवाडी, हडपसर,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शि बीराचे अयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात मोतीबिंदू व नेत्र तपासणी होणार असुन मोफत मोतीबिंदू भिंग रोपण शस्त्रक्रिया शिबिर व मोफत डोळे तपासणी व अल्पदरात चष्मे वाटप शिबिरात केले जाणार आहे. शुक्रवार दि.११ रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ वाजेपर्यंत मारूती मंदिर, श्रीपूर या ठिकाणी डोळे तपासणी शिबिराचे आयोजन केलेले आहे, तरी श्रीपूर व परिसरातील सर्व गरजू नागरिकांनी डोळे तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा असे अवाहन नगरसेवक निनाद प्रभाकर पटर्वधन यांनी केले आहे.

## ३४८ जागांसाठी दोन दिवस ऑनलाईन रोजगार मेळावा

**सोलापूर** : जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांच्यामार्फत १० आणि ११ नोव्हेंबर २०२२ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त सचिन जाधव यांनी दिली. जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने ऑनलाईन रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. रोजगार मेळाव्यात १० वीं, १२ वीं, ट्रेनी, आय.टी.आय. टर्नर, सी.एन.सी. ऑपरेटर, मशिनिस्ट, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, बी.एस्सी.. एम.एस्सी, इंजिनिअर अशा प्रकारची एकूण ३४८ पेक्षा जास्त रिक्तपदे चार उद्योजकांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अधिसूचीत केलेली आहेत.नोकरी इच्छुक उमेदवारांनी संकेतस्थळावर नोंदणी पूर्ण करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी ऑनलाईन अर्ज करावेत. जेणेकरून त्यांना मेळाव्यात सहभागी होता येईल. याबाबत काही अडचण आल्यास कार्यालयाच्या ०२१%-२९५०९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट, पार्क चौक, सोलापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन श्री. जाधव यांनी केले आहे.




## सदगुरु कारखान्याचा पहिला हप्ता २५०० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा

पिलीव प्रतिनिधी- सातारा - सांगली- सोलापूर जिल्हयाच्या सरहद्दीवर राजेवाडी येथे असणाऱ्या श्री श्री सदगुरु साखर कारखानान्याने २०२२-२३ हया चालू गळीत हंगामामध्ये गळीतास येणाऱ्या ऊसास पहीला हप्ता २५०० रुपये जाहीर केला आहे. त्याप्रमाणे पहीला हप्ता शेतकऱ्यांनच्या खात्यावर जमा केला असल्याचे कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरीराव व व्हा चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील यांनी सांगितले. पहीला हप्ता २५०० रुपये जाहीर केल्या मुळे शेतकऱ्यांनमध्ये समाधानाचे व आनंदाचे वातावरण पसरले आहे. यामुळे यंदा च्या गळीत हंगामामध्ये सदगुरु साखर कारखाना चांगला दर देणार हे निश्चित झाले आहे. तसेच सदगुरु साखर कारखाना नेहमीच सभासद बांधवाचे हित जोपासत आला असुन सर्व सभासदांचा ऊस वेळेवर व नोंदी प्रमाणे नेणार असल्याचे चेअरमन एन शेषागिरीराव यांनी सांगितले.

## हॉटेलसमोरून भरदिवसा कारची काच फोडून साडेचार लाखाचे दागीने लंपास

सुराज्य/मोहोळ

मोहोळ-सोलापूर महामार्गावर पाकणी पाटीजवळ सुनिल हॉटेल समोर पार्किंग केलेल्या कारची काच फोडून भर दिवसा साडेचार लाखाचा मुद्देमाल चोरट्याने लंपास केला

याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहीती नुसार सिराज युसूफ शेख (रा. कोंढवे धावडे पुणे) हे आपल्या फॅमेली सह बिदर (कर्नाटक) येथे कार्यक्रमासाठ गेल होते. परंतू पुण्याकडे येत असताना त्यांनी राष्ट्रीय महामार्गावरील मोहोळ सोलापूर दरम्यान पाकणी पाटीजवळ असणाऱ्या सुनिल हॉटेल समोरच त्यांच्या गाड्या पार्कीगच्या ठिकणी थांबवल्या व वॉशरुमला गेले काही वेळातच त्याच्या गाडीची काच फुटली असल्याचे त्याच्या नातेवाईकाने त्याना सांगीतले.




आतील सामानाची पहाणी केली असता त्यांच्या तीन बॅगा गायब असल्याचे लक्षात आले. आजूबाजूला चौकशी केली वॉचमन कडेही चौकशी केली. परंतू काही माहीती मिळाली नाही. तेव्हा चोरीचा प्रकार त्यांच्या लक्षात आला होटेल मालकाला बोलावून घेतले. त्यांना हा प्रकाराबाबत विचारणा केली. याबाबत मोहोळ पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली.

ही घटना बुधवारी भर दिवसा दुपारच्या वेळेत पावणे चार ते साडेचार वाजण्याच्या दरम्यान घडली. यात तीन तोळे वजनाच्या सोन्याच्या पाटल्या सव्वा तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र एक तोळ्याचे सोन्याचे लॉकेट दोन तोळ्याचे लॉकेट अंगठी फुले झुबे बाळ्या असा साडेचार लाखाचा ऐवज चोरीला गेला आहे. भर दुपारी वर्दळीच्या वेळी वॉचमन असताना चोरट्याने येवढे धाडस केलेच कसे याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे या घटनेचा तपास मोहोळ पोलिस करित आहेत.

### उपोषणाला बसताच प्रशासन जागे झाले

## लवंग गावासाठी एसटीसेवा झाली सुरु



सुराज्य/श्रीपूर

गेल्या २० वर्षापासून अकलुज लवंग एस टी सेवा बंद झाली होती. त्यामुळे शाळेसाठी जाण्यासाठी विद्यार्थी, विद्यार्थींनी, जेष्ठ नागरीक, यांचे मोठे हाल होत होते. परत लवंग गावाची एस टी सेवा चालू करण्यासाठी वारंवार पाठपुरावा करून एस टी बस सोडण्याचे ९ नोव्हेंबर रोजी पत्र दिले होते.

परंतू श्रेय लाटण्याच्या कारणावरुन काही राजकिय पुढाऱ्यांनी या एस टी बसची अडवणूक केली होती. परंतु गुरुवारी लवंग येथील युवक व महिलांनी, ग्रामस्थांनी उपोषणाला बसण्याचा निर्धार करून बस गावत आल्यावर उपोषण सोडू असे सांगीतले होते. परंतु कॉग्रेसचे सोलापुर जिल्हा अध्यक्ष डॉ धवलसिंह मोहित पाटील यांनी या प्रश्नाबाबत एस टी अधिकाऱ्यांशी चर्चा करून एस टी बस लवंग गावात चालू करण्यासाठी तोडगा काढून ११ नोव्हेंबर रोजी बस सकाळी ९ वा. १५ मी अकलूज वरून सोडण्याचे आदेश अधिकाऱ्यांनी दिले. यानंतर अकलुज - लवंग एस टी बस सुरु झाल्याने लवंग ग्रामस्थांनी सुरु केलेले उपोषण सोडले आहे.

यावेळी लवंग गावचे युवानेते राहुलदादा टिक पाटील, लवंग सोसायटीचे चेअरमन राजेंद्र वाघ ,अभिषेक पाटील, पिंटू तात्या चव्हाण, विनोद भोसले, प्रविण वाघ, सचिन चव्हाण, वायदंडे, वैभव वाघ, सोमनाथ भोळे, शरदभाऊ भोळे, यांच्यासह अनेक तरूण, महिला उपस्थित होत्या. लवंग गावात एसटी सेवा सुरु झाल्याने शाळेचे विद्यार्थी ज्येष्ठ नागरिक ग्रामस्थ यांची मोठी सोय होणार आहे यामुळे लवंग गावामध्ये आनंदी वातावरण निर्माण झाले आहे.

### मोहोळ तहसिलसमोर विविध मागण्यांसाठी

## वंचित बहुजन आघाडीचे धरणे आंदोलन

सुराज्य/मोहोळ

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने विविध मागण्यासाठी मोहोळ तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.



अतिवृष्टी बाधीत शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार अनुदान देण्यात यावे. साखर कारखाने शेत कऱ्यांना वजन काटा करताना काटा मारून पिळवणूक करतात रिकव्हरी कमी दाखवतात भाव कमी देतात. त्यासाठी साखर कारखान्यावर शासकीय अधिकारी नेमावा. मागील वर्षी एफ आर पी रक्कम शेतकरी बांधवांना मिळली नाही ती देण्यात यावी न देणाऱ्या कारखान्यावर कारवाई करावी. विमा कपन्यांनी शेतकऱ्यांना विम्याची रक्कम देण्यात यावी अन्यथा शासनाने न देणाऱ्या कंपन्यावर कारवाई करावी. भूमी हीन शेतमजूरांना शासनाने कसन्यासाठी जमींन द्यावी. केसरी शिधा पत्रिका धारकांना धान्य देण्यात यावे. गुलशन नगर येथे अंगनवाडीचे असलेले अर्धवट बांधकाम तात्काळ पूर्ण करण्यात यावे या मागण्या साठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मोहोळ तहसिल कार्यालया समोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी पोपट सोनवणे, तुकाराम पारसे, सखूबाई क्षिरसागर, रमेश शिंदे, आकाश सरवदे, पोपट सोनटक्के, सौरभ आवारे, तानाजी वाघमारे, समाधान बनसोडे, सचिन गवळी, महादेव गाडे, पोपट गाडे, विजयकुमार भालेराव, मोहन रणदिवे आदी आंदोलनात सहभागी झाले होते.

### आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या निधीतून

## माळीनगर मुस्लीम समाज दफनभूमीसाठी १० लाख मंजूर

**अकलूज** : आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या आमदार विकास निधी २०२१-२०२२ मधून माळीनगर येथील मुस्लिम समाजाच्या दफनभूमीच्या वॉलकंपाऊंड बांधकामा करींता १० लाखांचा निधी उपलब्ध झाल्याची माहीती माळीनगर ग्रामपंचायत सदस्य निंबाळकर यांनी दिली.



माळीनगर मुस्लिम समाजाने आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्याकडे दफनभूमीच्या वॉलकंपाऊंडच्या बांधकामाकरींता करीता निधीची उपलब्ध करण्याची विनंती केली होती, सदर मागणींची दखल घेत मोहिते-पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यानुसार मोहिते-पाटील यांच्या मागणीची तात्काळ दखल घेऊन सदर काम सार्वजनिक बांधकाम विभाग अकलूज कडे वर्ग करण्यात आले असून माळीनगर मुस्लिम समाज दफनभूमीच्या वॉलकंपाऊंड बांधकामाकरींता निधी मंजूर झाल्याने मुस्लिम समाजाच्या वतीने आ.मोहिते-पाटीलांचे अभार व्यक्त केले आहेत.

# कनेक्टिव्हिटी, डिजिटल मीडिया बनतेय मूलभूत गरज

### जवाहर सरकार यांचे प्रतिपादन; एमआयटी डब्ल्यूपीयूतर्फे तीन दिवसीय चौथ्या राष्ट्रीय माध्यम व पत्रकारिता परिषदेचे उद्घाटन

सुराज्य/पुणे

अन्न, वस्त्र, निवारा आणि कनेक्टिव्हीटी या आजच्या काळातील मूलभूत गरजा आहेत. डिजिटल मीडिया आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला आहे. याच गोष्टींचा लाभ घेण्यासाठी माध्यमे, राजकारण आणि उद्योग यांचे विलीनीकरण होताना दिसतेय. माध्यमांचा उपयोग करून आपले स्थान मजबूत करण्यावर राजकारण्यांकडून भर दिला जात आहे, असे प्रतिपादन राज्यसभा खासदार आणि प्रसारभारतीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी जवाहर सरकार यांनी केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कुल ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशनच्या वतीने आर. के. लक्ष्मण म्युझियम, मुंबई प्रेस क्लब, द फॉरेन करस्पाँडंट क्लब आणि पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सहयोगाने विश्वराज बाग, लोणी काळभोर येथील विश्वशांती सभागृहात (घुमट) आयोजित तीन दिवसीय चौथ्या राष्ट्रीय माध्यम व पत्रकारिता परिषदेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी एशियन न्यूज इंटरनॅशनलच्या




(एएनआय) संपादिका स्मिता प्रकाश, ज्येष्ठ पत्रकार व राजकीय विश्लेषक राशीद किडवई, आर. के. लक्ष्मण म्युझियमच्या संचालिका उषा लक्ष्मण, एमआयटी वर्ल्ड पीसी युनिव्हर्सिटीचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. राहुल विश्वनाथ कराड, प्र-कुलगुरू डॉ. रवीकुमार चिटणीस, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष स्वप्नील बापट, स्कुल ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशनचे संचालक धीरज सिंह, दूरदर्शनचे माजी महासंचालक मुकेश शर्मा, विद्यार्थी प्रतिनिधी इर्तिका एजाज, तेजस कोल्हटकर आदी उपस्थित होते.

एनडी टीव्हीचे वरिष्ठ संपादक सुशीलकुमार महापात्रा (ब्रॉडकास्ट), मुक्त पत्रकार रवलींन कौर (प्रिंट) व मुक्त पत्रकार नीतू सिंग (डिजिटल) यांना पहिला 'जर्नालिझम फॉर पीस' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ५० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

जवाहर सरकार म्हणाले, कोविड काळात ओटीटी, मोबाईल जर्नालिझमने आपले स्थान प्रस्थापित केले आहे. त्यामुळे वृत्तपत्रे, वाहिन्या यांसह सोशल मीडिया, डिजिटल मीडिया या नवमाध्यमांचा प्रभाव मोठा आहे. निर्भया प्रकरण, अण्णा हजारे यांचे आंदोलन, नरेंद्र मोदी यांचे लॉन्चिंग यामध्ये या नवमाध्यमांचा फार प्रभावी उपयोग केला गेला. फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअप द्वारे परिवर्तनाच्या मोहीमा राबवल्या गेल्या. आज ही माध्यमे आपल्या प्रत्येकाच्या हाती आल्याने प्रत्येकाला आवाज उठवण्याची संधी मिळाली आहे. स्मिता प्रकाश म्हणाल्या, माध्यमांचे विविध पर्याय उपलब्ध झाल्याने सामान्य नागरिकही आवाज उठवू शकतो. सोशल मीडियाचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे.

प्रत्येकाच्या हाती नवी माध्यमे आल्याने स्वत:कडे लक्ष खेचून घेण्याची स्पर्धा लागली आहे. त्यातून गोंधळाचे वातावरण, चीड आणि नकारात्मता तयार होत आहे. मात्र, अशा गोंधळ घालणाऱ्यांपासून आपण सावध राहत नैतिकता आणि तत्वनिष्ठता जपायला हवी. भारतातील माध्यम उद्योग व्यापक आहे. येथे २३ पेक्षा अधिक भाषेत वृत्तपत्रे निघतात. ९०० पेक्षा अधिक सॅटेलाईट चॅनेल्स असून, हजारो डिजिटल चॅनेल्स व पोर्टल्स यामुळे वेगवेगळ्या संधी मोठ्या प्रमाणात आहेत.प्रा. राहुल विश्वनाथ कराड म्हणाले, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या माध्यमांवर समाजप्रबोधन, परिवर्तनाचे दायित्व आहे. समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्नशील असावे. सोशल मीडियाच्या प्रभावी काळात संवादाभिमुख व शांततापूर्ण वातावरणात समाजाहिताची पत्रकारिता होणे गरजेचे आहे. जातीयवाद, धर्मिकता, भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीला आळा घालून विकासाच्या मुद्यांवर बोलणारी पत्रकारिता ही आजची गरज आहे.

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी उपस्थितांना ऑनलाईन स्वरूपात मार्गदर्शन केले. सुशीलकुमार महापात्रा, नीतू सिंग, रवलींन कौर यांनी सत्काराला उत्तर दिले. स्वप्नील बापट, मुकेश शर्मा यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. रवींकुमार चिटणीस यांनी 'एमआयटी' मार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची विस्तृत माहिती दिली. धीरज सिंग यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गुरुप्रसाद राव यांनी आभार मानले.

सुराज्य सोलापूर
**Classified**

**विवाह विषयक**

● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : **7387906921**
(121122)

## ईडी नक्की काय करते?

### पीएमएलए कोर्टात एकही खटला पूर्ण नाही; न्यायाधीशांची चपराक

✔ सुराज्य/मुंबई : गेल्या काही दिवसांपासून ईडीने अनेक ठिकाणी धाडी मारून संशयितांना ताब्यात घेतले आहे. त्यातच, संजय राऊत यांच्या प्रकरणावर सुनावणी सुरू असताना पीएमएल कोर्टाचे न्यायाधीश एम. जी. देशपांडे यांनी ईडीला चपराक लगावली आहे. पीएमएल कोर्ट सुरू झाल्यापासून एकही खटला पूर्ण झालेला नाही आणि याचे श्रेय ईडीला जाते, असे पीएमएलए कोर्टाचे न्यायमूर्ती एम. जी. देशपांडे म्हणाले.

संजय राऊत यांना बुधवारी पीएमएल कोर्टाने जामीन दिला. १०२ दिवस तुरुंगात राहिल्यानंतर अखेर त्यांची जामिनावर सुटका झाली. हा जामीन देताना पीएमएलए कोर्टाने काही निरिक्षणं नोंदवली आहेत. यामध्ये ईडीवर त्यांनी ताशेरे ओढले. एम. जी देशपांडे यांनी नमूद केले की, पीएमएलए कोर्ट स्थापन झाल्यापासून एकही खटला पूर्ण झालेला नाही आणि याचे श्रेय ईडीला जाते. या न्यायालयाच्या स्थापनेपासून एकही खटला पूर्णपणे चाललेला नाही, ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. ईडीने सादर केलेल्या पुराव्यांद्वारे निष्कर्ष काढून न्यायालयाला गेल्या दशकापासून एकही निर्णय देता आले नाही. कोर्टाच्या स्थापनेपासून आणि माझ्या संपूर्ण कार्यकाळात एकही निर्णय झालेला नाही.

ईडी तपास करण्यासाठी अधिक वेळ मागते. ईडीकडून चपळाईने अटक केली जाते. पण खटले मात्र गोगलगायींच्या गतीने चालवले जातात.

खटला पूर्ण न करण्यास ईडी जबाबदार नाही का, असा सवालही न्यायालयाने उपस्थित केला आहे.

# मुंबईत '२६/११'च्या पुनरावृत्तीची शक्यता

✔ सुराज्य/मुंबई

**मुंबईतील महालक्ष्मी येथील हाजीअली दर्ग्यावर हल्ला करणार असल्याचा धमकीचा निनावी फोन काही दिवसांपूर्वीच मुंबई पोलिसांच्या कंट्रोल रुममध्ये आला होता. ही घटना ताजी असतानाच मुंबईवर पुन्हा एकदा दहशतवादी हल्ल्याची शक्यता वर्तवली जात आहे. दहशतवादी ड्रोन आणि छोट्या विमानांच्या साह्याने मुंबईत दहशतवादी हल्ले करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यानंतर मुंबईतील दहशतवादी हल्ल्यासंदर्भात अलर्ट जारी करण्यात आला आहे.**

**सुरक्षा यंत्रणा तैनात**

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईत रिमोट कंट्रोल विमानातून हल्ल्याचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईतील प्रमुख ठिकाणांसह दहशतवाद्यांनी व्हीव्हीआयपींनाही लक्ष्य



केल्याचे बोलले जात आहे. मुंबईत सध्या ड्रोन उडवण्यास बंदी घालण्यात आली आहे. मुंबई पोलिसांनी जारी केलेल्या आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, जर कोणी या नियमांचे उल्लंघन केले तर त्याला आयपीसी कलम १८८ अंतर्गत शिक्षा केली जाणार आहे.

या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. याशिवाय, गुप्तचर यंत्रणाही पूर्णपणे सतर्क झाल्या असून, मुंबईतील अनेक गोष्टींवर बंदी घालण्यात आली आहे.

या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलीस आयुक्तांनी जारी केलेल्या आदेशानुसार, दहशतवादी आणि देशद्रोही ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडरचा वापर करून हल्ला करण्याची शक्यता आहे. तसेच, व्हीव्हीआयपींनाही लक्ष्य करण्याची शक्यता आहे. त्यामुळे खासगी हेलिकॉप्टर, हॉट एअर बलूनसह अन्य संशयास्पद गोष्टींच्या वापरावर पुढील ३० दिवस बंदी घालण्यात आली आहे.

या काळात फक्त मुंबई पोलीस हवाई पाळत ठेवणार आहेत. हा आदेश १३ नोव्हेंबर ते १२ डिसेंबरपर्यंत लागू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

## जडेजाची पत्नी गाजवणार गुजरात निवडणुकीचे मैदान

✔ सुराज्य/अहमदाबाद

**क्रिकेटचे मैदान गाजवणारा टिम इंडियाचा ऑल राउंडर खेळाडू सर रवींद्र जडेजाची पत्नी आता निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबा जडेजा जामनगरहून उत्तर विधानसभा मतदारसंघात भाजपकडून लढणार आहे.**



रिवाबा राजकारणाच्या रिंगणात उतरल्याने चर्चेला उधाण आले आहे. रिवाबाने तीन वर्षांपूर्वी लोकसभा निवडणुकांच्या दरम्यान भाजपमध्ये प्रवेश केला होता. तेव्हापासून ती राजकारणात सक्रिय आहे. तसेच भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर तिने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेटही घेतली होती.

२०१६मध्ये रवींद्र जडेजाने रिवाबासोबत लग्नगाठ बांधली आहे. रिवाबाचे मूळ गाव हे जुनागढ असले तरी ते तिचा जन्म राजकोट येथे झाला आहे. तिच्या जन्मापासून तिचे कुटुंब राजकोटमध्येच स्थायिक झाले. तिचे वडिल हरदेव सिंह सोलंकी मोठे उद्योजक आणि कंत्राटदार आहेत. तर, रिवाबाने मॅकेनिकल इंजिनिअरिंग केले आहे.

रिवाबाने भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर रवींद्र जडेजाची बहिण नैना जडेजासोबतच्या वादामुळे चर्चेत आली होती. नैना जडेजाने काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यामुळे त्यांच्यात कटुता आल्याचे बोलले जात होते.

रिवाबा जडेजा काँग्रेस नेते हरीसिंह सोलंकी यांची भाची आहे.

## फडणवीसांबाबत राऊतांचा सूर बदलला?

✔ सुराज्य/मुंबई



उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते आणि राज्यसभा खासदार संजय राऊत हे जवळपास साडेतीन महिन्यांनंतर तुरुंगातून बाहेर आले आहेत.

मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात विशेष पीएमएलए कोर्टाने जामीन मंजूर केल्यानंतर राऊत यांच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला. उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदावरून दूर करत राज्यात नवीन सरकार स्थापन झाल्यापासून तुरुंगात असलेले संजय राऊत हे बाहेर आल्यानंतर या सरकारचा खरपूस समाचार घेतील, असा अंदाज व्यक्त करण्यात येत होता. मात्र राऊत यांनी पहिल्या दिवशी तरी सरकारवर हल्लाबोल करणे टाळले आहे. तसंच शिवसेनेतील फुटीनंतर संजय राऊत ज्या भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर घणाघाती टीका करत होते, त्याच फडणवीसांवर राऊत यांनी आता मात्र स्तुतीसुमने उधळल्याचे दिसत आहे.

'महाराष्ट्रात एक नवीन सरकार स्थापन झाले आहे. मी मागील तीन महिन्यांपासून बाहेर होतो. या सरकारने काही चांगले निर्णयही घेतले आहेत. मी त्यांचं स्वागतही करतो. फक्त विरोधासाठी विरोध आम्ही कधी करणार नाही. ज्या गोष्टी राज्यासाठी, देशासाठी आणि इथल्या लोकांसाठी चांगल्या असतात त्यांचे नेहमी स्वागतच केले पाहिजे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही चांगले निर्णय घेतले आहेत. विशेषत: गरिबांना घरे देण्याचा निर्णय असेल किंवा म्हाडाचे अधिकार काढून घेण्याचा निर्णय आमच्या सरकारने घेतला होता, जे मला चांगलं वाटत नव्हतं, आता पुन्हा म्हाडाला अधिकार देण्याचा निर्णय फडणवीस यांनी घेतला आहे, हे चांगला निर्णय आहेत,' असे म्हणत संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले आहे.

## सासऱ्याची 'गादी' चालवणार सुनबाई!

✔ सुराज्य/लखनौ



ज्येष्ठ नेते मुलायम सिंह यादव यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या मैनपुरी लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकित समाजवादी पक्षाने त्यांच्या सूनबाई अर्थात अखिलेश यादव यांच्या पत्नी डिम्पल यादव यांना तिकिट दिले आहे.


कनौजच्या खासदार राहिलेल्या डिम्पल यांची उमेदवारी जाहीर झाल्याने सर्व उलटसुलट चर्चांना विराम मिळाला आहे. तेज प्रताप सिंह यादव यांना समाजवादी पक्षाकडून तिकिट मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती. तेज प्रताप हे यापूर्वीही मैनपुरीतून खासदार होते. तेज प्रताप हे मुलायम सिंह यांचे ज्येष्ठ बंधू रणवीर सिंह यादव यांचे सुपुत्र आहेत. मात्र डिम्पल यादव यांच्या नावावर शिक्कामोर्तब का करण्यात आले, याची कारणे पण समोर आली आहेत.

**गड्या आपुला देशच बरा!**

## युक्रेनहून आले; त्यांनी धरला 'बीएस्सी'चा मार्ग

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**रशिया-युक्रेन युद्धामुळे युक्रेनमधील वैद्यकीय अभ्यासक्रम अर्धवट सोडून भारतात परताव्या लागलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी 'गड्या आपुला देश बरा..', म्हणत यंदा भारतात वैद्यकीय सोडून अन्य अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यास प्राधान्य दिले आहे. बीएस्सी, इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांनी पसंती दिली असून, शैक्षणिक तसेच आर्थिक नुकसान टाळण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे या विद्यार्थ्यांनी सांगितले.**



शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये पहिल्या सत्राचे शिक्षण सुरू होते न होते तोच युक्रेनवर रशियाने केलेल्या हल्ल्यामुळे युक्रेनमध्ये शिक्षणासाठी गेलेल्या जवळपास १८ हजार विद्यार्थ्यांना शिक्षण अधवट सोडून भारतात परतावे लागले होते.

वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाला प्रवेश घेतलेल्या ५ ते ६ हजार भारतीय विद्यार्थ्यांचा पहिल्या वर्षाचा केवळ २० ते ३० टक्के अभ्यासक्रम पूर्ण झाला होता. यापैकी बहुतांश विद्यार्थ्यांनी यंदा रशिया, हंगेरी, कझाकस्तान, रुमानिया यासारख्या देशांमध्ये पुन्हा पहिल्यापासून वैद्यकीय अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेला असला तरी, अनेक विद्यार्थ्यांनी हे वैद्यकीय शिक्षण सोडून भारतात अन्य विद्याशाखांना प्रवेश घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

## राऊतांना पुन्हा गोवण्याचा प्रयत्न

✔ सुराज्य/मुंबई : मुंबई-शिवसेनेचे नेते आणि राज्यसभेचे खासदार संजय राऊत १०२ दिवसांनंतर तुरुंगाबाहेर आले. त्यांच्या बाहेर येण्याने शिवसेनेत चैतन्य पसरले आहे. मात्र, संजय राऊतांना पुन्हा गोवण्याचा प्रयत्न होऊ शकतो, अशी शक्यता शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली आहे. तसंच, ठाकरेंनी केंद्रीय यंत्रणांवरही निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर टीका केली.

केंद्रीय यंत्रणा सरकारच्या पाळीव प्राण्यांप्रमाणे वागत आहेत. केंद्र सरकार न्यायदेवतासुद्धा अंकित करायला सुरुवात करतेय की काय असे वक्तव्य रिजूजू यांनी केले आहे. न्यायालय हे सर्वसामान्यांच्या आशेचं किरण असतं. पण न्यायालयाही आपल्या बुडाखाली घेण्याचा प्रयत्न केंद्र सरकार करत असेल तर सामान्य लोकांनी त्याला विरोध केला पाहिजे. केंद्रीय यंत्राणांचा दुरुपयोग करून अनेक पक्ष फोडले गेले. आजही फोडले जातात. बेकायदेशीर अटक केली जाते. खोट्या केसेस केल्या जातात. न्यायालयाने बुधवारी दणका दिल्यानंतरही परत संजयला गोवण्याचा प्रयत्न होऊ शकतो, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## नवलखा यांना कोर्टाचा दिलासा

✔ सुराज्य/मुंबई : भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणातील आरोपी गौतम नवलखा यांना एक महिन्यासाठी घरात नजरकैदेत ठेवण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. नवलखा यांना नजरकैदेत ठेवण्यात येणाऱ्या परिसराची नीट तपासणी करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना न्यायालयाने दिले आहेत. येत्या ४८ तासांमध्ये या आदेशाचे पालन करण्याच्या सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्या आहेत. नजरकैदेदरम्यान घराच्या आवारात पोलीस कर्मचाऱ्यांकडून देण्यात येणाऱ्या संरक्षणासाठी २ लाख ४ हजार रुपये भरण्यासही न्यायालयाने नवलखांना सांगितले आहे.

## मालदीवमधील आगीत ९ भारतीयांचा समावेश

✔ सुराज्य/मुंबई : मालदीवची राजधानी माले येथे गुरुवारी विदेशी कामगारांच्या घरांना लागलेल्या भीषण आगीत १० जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच अनेकजण जखमी झाले आहेत. मृत्यू झालेल्यांमध्ये नऊ भारतीयांचाही समावेश असल्याची माहिती पुढे आली आहे. मालदीवमधील भारतीय उच्चयुक्त कार्यालयाकडूनही याबाबतचे एक ट्टीट करण्यात आले असून त्यांनी मदतीसाठी फोन नंबरही दिले आहेत. आगीचे कारण अद्यापही अस्पष्ट आहे.

## दिल्लीतून राऊतांना बड्या भाजप नेत्याचा फोन

✔ सुराज्य/मुंबई

**पत्राचाळ गैरव्यवहार प्रकरणात शिवसेना नेते खासदार संजय राऊत १०३ दिवसांची जेलवारी भोगून बुधवारी रात्री तुरुंगाबाहेर आले. तीन महिन्यानंतर राऊतांचे दर्शन झाल्याने मुंबईतील शिवसैनिकांनी बुधवारी दिवाळी साजरी केली. ऑर्थर रोड जेलपासून ते दादरपर्यंत आणि बाळासाहेबांच्या स्मृतिस्थळापासून ते भांडूपच्या निवासस्थानापर्यंत शिवसैनिकांनी राऊतांचे दणक्यात स्वागत केले. रात्री उशिरा गरी पोहोचलेल्या राऊतांचे कुटुंबियांनीही पारंपारिक पद्धतीने स्वागत करताना त्यांचे औक्षण केले.**



यावेळी राऊतांनी आईला मारलेली कडकडून मिठी हा सगळ्यांना भावुक करणारा क्षण होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी सकाळी पत्रकारांशी संवाद साधताना राऊतांनी मोठा गौप्यस्फोट करत दिल्लीतील भाजपच्या बड्या नेत्याचा फोन आल्याचे सांगितलं.

संजय राऊत यांनी गुरुवारी सकाळीच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. या संवादात त्यांनी जेलमधील १०३ दिवसांच्या निवडक आठवणी, न्यायालयाच्या तारखांचा प्रसंग, जामीनाचा क्षण, कोर्टाची निरीक्षणे यावर मत व्यक्त करतानाच सुटकेनंतरच्या ८ तासांचा घटनाक्रमही त्यांनी विषद केला.

यावेळी सातत्याने मोदीविरोधी सूर लावणाऱ्या भाजप खासदार सुब्रह्मण्यम स्वामी यांचा मला फोन आल्याचे राऊतांनी सांगितले. त्यांनी फोन करुन माझी विचारपूस केली. तब्येतीची काळजी घेण्याचा सल्ला दिला. तसेच चांगल्या आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्याचे राऊतांनी सांगितले.

## जप्त वाहनांचा लिलाव सुरु

✔ सुराज्य/पुणे

**पुणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने जप्त केलेली ११०० वाहने भंगारात काढण्यात येणार आहेत. ही वाहने भंगारात काढण्यासाठी त्यांची किंमत निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानंतर लिलाव करून ही वाहने मोडीत काढण्यात येतील.**



महापालिकेने शहरातील बेवारस वाहनांवर कारवाईचा बडगा उगारला होता. अतिक्रमण विभागाने पहिल्या टप्प्यात केलेल्या कारवाईत १०० हून अधिक वाहने जप्त केली होती. त्यातील काही वाहने नागरिकांनी परत नेली. उर्वरित वाहने घेऊन जाण्यासाठी नागरिकांना नोटिसा पाठविण्यात आल्या होत्या.

नागरिकांनी आपली वाहने कायद्यानुसार वेळेत परत न नेल्यास या वाहनांचा लिलाव करण्यात येईल, असेही महापालिकेने स्पष्ट केले होते. तरीही सुमारे ११०० वाहने अतिक्रमण विभागाच्या ताब्यात आहेत. ही वाहने मोडीत काढण्यासाठी त्यांची किंमत निश्चित करण्यात येत आहे, अशी माहिती अतिक्रमण विरोधी विभागाचे प्रमुख माधव जगताप यांनी दिली.

## माळरान संवर्धन आराखडा तयार

### राज्यभरात आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे मॅपिंग पूर्ण

✔ सुराज्य/पुणे : **ब्रिटिशांच्या काळापासून पडिक जमिनींचा शिक्का बसल्याने दुर्लक्षित राहिलेल्या माळरानांना जंगलांप्रमाणे संरक्षण मिळावे, या उद्देशाने अभ्यासकांनी गवताळ प्रदेश, माळरांनाचा कृती आराखडा तयार केला आहे.**

आराखड्याच्या निमित्ताने राज्यातील माळरानांचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे मॅपिंग झाले असून, नैसर्गिक परिसंस्थेतील या प्रदेशांचे महत्त्व अधोरेखित करणारा मसुदाही तयार झाला आहे.

बेंगळुरू येथील अशोका ट्रस्ट फॉर रिसर्च इन इकॉलॉजी अँड एन्व्हायर्न्मेंट (एट्री) आणि द ग्रासलँड ट्रस्ट यांच्या एकत्रित प्रयत्नातून या आराखड्याची निर्मिती झाली आहे. यासाठी वन विभाग, पशुपालन विभागाने आवश्यक सर्व प्रकाराची माहिती देण्यासाठी सहकार्य केले.

या प्रक्रियेत अबी वनक, मिहीर गोडबोले, प्रेरणा सेठिया, इरावती माजगावकर, अनुजा म्हलोत्रा, चेतन मिसर, निकिता सबनीस आणि प्रतीक जोशी सहभागी झाले होते. जंगलांकडे सगळ्यांचे लक्ष असते; पण राखीव वनक्षेत्रांप्रमाणे वनाच्छादित भाग नसल्याने माळरानांना पडिक समजले जाते.

## वस्त्रोद्योगावर अस्थिरतेचे सावट

✔ सुराज्य/कोल्हापूर

**गेल्या हंगामाच्या तुलनेने या हंगामात कापसाचे भाव कमी झाले असले तरी वस्त्रोद्योगातील अर्थकारणाला अद्यापही गती आलेली नाही. कापूस दरात चढ-उतार होत असल्याने सूत, कापड विक्रीवर परिणाम होत आहे. अस्थिरतेचे सावट अजूनही वस्त्रोद्योगातून दूर होत नसल्याने चिंतेचे जाळे दाटले आहे.**

यावर्षी वस्त्रोद्योगात दिवाळीच्या वेळी आशेचे किरण उजळले होते. गेल्या हंगामात कापूस दराने विक्रमी दरवाढ पाहिली होती. ६० हजार रुपये प्रतिखंडी असणारा कापूस दर लाखाच्या वर गेला होता. याचा परिणाम वस्त्रोद्योगाच्या मूल्य साखळीवर होऊन एकूणच उद्योग कमालीचा अडचणीत आला होता.

या हंगामात कापसाचे पीक चांगले असल्याने आशा बळावल्या आहेत. पण सुरुवात काही उमेद वाढवणारी नव्हती. दिवाळी पाडव्या वेळी कापडाचे सौदे निराशाजनक राहिले. काही प्रकारच्या कापडांना अजिबात मागणी नसल्याने यंत्रमागधारकांना हा आश्चर्याचा धक्का होता. दिवाळी उलटून पंधरवडा लोटला तरी वस्त्रोद्योगाचे चक्र अद्यापही गतिमान होताना दिसत नाही. यामागे वस्त्रोद्योगाचा मूलाधार असलेल्या कापूस दरातील अस्थिरता हे कारण आहे.

## मंदीचा फटका

# ॲमेझॉनचे एक लाख कोटी पाण्यात...!

✔ सुराज्य/कॅलिफोर्निया

**जगातील सर्वात मोठी ई-कॉमर्स कंपनी ॲमेझॉनने आणखी एक विक्रम आपल्या नावे केला आहे. मात्र, कंपनीला हा विक्रम नक्कीच महागात पडला असेल. ॲमेझॉन ही जगातील पहिली कंपनी बनली आहे, जिचे बाजार मूल्य १ ट्रिलियन डॉलरने (१० ट्रिलियन डॉलर) घटले आहे. अर्थव्यवस्थेची खराब स्थिती, कमाईच्या आकडेवारीत सातत्याने घसरण आणि शेअर्सची प्रचंड विक्री ही ॲमेझॉनच्या मूल्यांकनातील या मोठ्या घसरणीचे कारण आहे. ॲमेझॉन सप्टेंबर २०१८ मध्ये एक ट्रिलियन डॉलर्सच्या बाजारमूल्याची कंपनी बनली.**

२१ जून रोजी जेफ बेझोसची कंपनी ॲमेझॉनचे बाजारमूल्य १.८८२ ट्रिलियन डॉलर होते. त्याच वेळी, गुरुवारी त्यांचे बाजार मूल्य ८७८ अब्ज डॉलरपर्यंत घसरले. गेल्या वर्षी ॲपलला मागे टाकत जगातील सर्वात मौल्यवान कंपनी बनलेल्या मायक्रोसॉफ्टलाही मोठा झटका बसला. मायक्रोसॉफ्टचे बाजारमूल्य ९०० अब्ज डॉलरनी घसरले तर अमेरिकेतील पहिल्या पाच सर्वात मौल्यवान तंत्रज्ञान (आयटी) कंपन्यांना यावर्षी तब्बल ४ ट्रिलियन डॉलरचे नुकसान झाले आहे, जे तुर्की, अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंडच्या एकूण जीडीपीपेक्षा जास्त आहे.

**कमकुवत तिमाही निकाल**

gizmodo.com च्या अहवालानुसार, ॲमेझॉनने गेल्या महिन्यातच तिसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर केले, त्यानंतर गुंतवणूकदारांची निराशा झाली. विशेष म्हणजे, कंपनीने चौथ्या तिमाहीत केवळ २.८% वार्षिक वाढीचा अंदाज व्यक्त केला आहे, जो त्यांच्यासाठी खूपच कमी आहे. सतत नवनवीन उंची गाठणाऱ्या ॲमेझॉनला ई-कॉमर्स खरेदीत घट झाल्याने मोठा तोटा सहन करावा लागला आहे.

**नवीन भरतीवर बंदी**

दरम्यान, तिसऱ्या तिमाहीचे आकडे जाहीर करताना मेझॉनचे सीईओ अँडी जेसी म्हणाले की, आर्थिक वातावरणात खूप बदल होत आहेत. अँडीने सांगितले की ते त्याच्या प्रमुख दीर्घकालीन



उद्दिष्टांशी समतोल साधून गुंतवणूक धोरण तयार करेल. मात्र, चांगली गोष्ट म्हणजे ॲमेझॉनने अद्याप कर्मचाऱ्यांना कामावरून काढलेले नाही मात्र, कंपनीने नव्या भरतीला स्थगिती दिली आहे. लक्षात घ्या की मेटासह अनेक दिग्ज टेक कंपन्यांनी उत्पन्नातील घट लक्षात घेऊन कर्मचारी कपात केली आहे.

**मेटाचा ११ हजार कर्मचाऱ्यांना नारळ**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म फेसबुकची मूळ कंपनी, मेटा प्लॅटफॉर्म्स इंक. ने बुधवारी ११,००० हून अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून काढले तर, कंपनीने आधीच नवीन भरती थांबवली आहे. मेटा सीईओ मार्क झुकरबर्गने टाळेबंदीबद्दल माफी मागितली आणित्यांच्याकडे दुसरा पर्याय नसल्याचे सांगितले.

**शेअर्स ५०% घसरले**

ॲमेझॉन, जगातील सर्वात मोठी ऑनलाइन रिटेलर, यावर्षी ई-कॉमर्स क्षेत्रात मोठ्या मंदीचा सामना करत आहे. तर कंपनीला कोरोना साथीच्या आधीच्या स्थितीपर्यंत पोहोचण्यासाठी आणखी थोडा वेळ लागू शकतो. मंद विक्री, वाढता खर्च आणि व्याजदरात झालेली वाढ यामुळे त्याचे शेअर्स जवळपास ५० टक्क्यांनी घसरले आहेत. तसेच ब्लूमबर्ग आकडेवारीनुसार ॲमेझॉनचे सह-संस्थापक जेफ बेझोस यांनी सुरुवातीच्या दिवसांपासून कंपनी ८३ अब्ज डॉलरवरून १०९ अब्ज डॉलरपर्यंत वाढल्याचे पाहिले आहे.

# अनियंत्रित नर्सरी स्कूल आता पालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या नियंत्रणाखाली आणणार

## महापालिका आयुक्तांचे आदेश : प्रशासनाधिकारी करतायेत आराखडा



✔ सुराज्य/सोलापूर

### मे महिन्यापासून शाळांना आदेश देऊ : जावीर

महापालिका आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी प्रशासन अधिकारी संजय जावीर यांनी पूर्व प्राथमिक शाळासाठी मार्गदर्शक सूचना व विकास मार्गदर्शक आराखडा तयार करण्याचे काम युद्धपातळीवर केले आहे. या खासगी पूर्व प्राथमिक शाळांमध्ये शाळा विकास आराखड्यानुसार पायाभूत भौतिक सुविधा उपलब्ध करण्यासह इतर मार्गदर्शक सूचना व आराखडा तयार करण्यात येत असल्याचेही प्रशासनाधिकारी संजय जावीर यांनी स्पष्ट केले. येत्या मे महिन्यापासून संबंधित पूर्व प्राथमिक शाळांना या संदर्भात आदेश देण्यात येतील. त्यांची माहिती महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाकडे मागविण्यात येईल. जनजागृती फलकही शहरात लावण्यात येतील अशी एकूणच तयारी करण्यात येत असल्याचे प्रशासनाधिकारी संजय जावीर यांनी सांगितले.

सोलापूर शहरात अनेक ठिकाणी मोठ्या संख्येने इंग्रजी माध्यमांच्या खाजगी पूर्व प्राथमिक म्हणजेच नर्सरी इंग्लिश स्कूल जोमात सुरू आहेत त्यांवर प्रशासकीय नियंत्रण नसल्याने मनमानी कारभारावर आळा घालण्यासाठी आता या सर्व पूर्व प्राथमिक शाळां या महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या नियंत्रणाखाली आणण्यात येणार आहेत. त्या संदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी प्रशासन अधिकारी संजय जावीर यांना दिले आहेत.

सोलापूर शहरात गेल्या अनेक वर्षांपासून विविध सोसायटी वस्त्या परिसरात अनेक पूर्व प्राथमिक शाळा म्हणजेच प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल सुरू आहेत. अशा नर्सरी स्कूलची संख्या मोठी आहे. मात्र या पूर्व प्राथमिक शाळांवर शिक्षण विभाग व इतर कोणत्याही प्रशासकीय यंत्रणेचे नियंत्रण नाही. यामुळे या पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा तसेच इतरही पूर्व प्राथमिक शाळा अनियंत्रित आहेत. कोणतेही नोंदणी या शाळांनी केली नाही. परिणामी शैक्षणिक पायाभूत सुविधा आहेत का ?, शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता काय ? फी किती घेतली जाते? विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते का? असे अनेक प्रश्न पालक व सुजाण नागरिकांमध्ये निर्माण होतात मात्र कोणत्याही प्रशासकीय यंत्रणाकडे नियंत्रण नसल्याने तक्रार कोणाकडे करणार असा प्रश्न नेहमीच नागरिकांना पडतो.

दरम्यान, महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांच्या निदर्शनास ही गंभीर बाब आल्यानंतर त्यांनी सोलापूर शहरातील सर्व खाजगी पूर्व प्राथमिक म्हणजेच प्री प्रायमरी स्कूलवर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही हाती घेण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले आहेत. यासंदर्भात महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी प्रशासन अधिकारी संजय जावीर यांना महापालिका आयुक्तांनी या पूर्व प्राथमिक शाळांवर नियंत्रणासाठी आवश्यक ती नियमावली मार्गदर्शक आराखडा व अन्य सूचना तयार करण्याचे आदेश दिले आहेत.

# विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात २०० फुटापर्यंत रुंदीकरण करण्याचा प्रस्ताव

## नागरिक, व्यापाऱ्यांचा गोंधळ; घरे न पाडण्याच्या सूचना

✔ सुराज्य/पंढरपूर

**पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात २०० फुटापर्यंत रुंदीकरण करण्याचा प्रस्ताव गुरूवारी सामान्य प्रशासनच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या उपस्थितीमध्ये संत तुकाराम भवन येथे सादर करण्यात आला.**



पंढरपूर विकास आराखड्यांतर्गत वाराणसी व उज्जैनच्या धर्तीवर कॉरिडॉर करण्यात येणार आहे. याबाबत स्थानिकांसह महाराज मंडळी यांना माहिती देण्यासाठी संत तुकाराम भवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमतराव जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, प्रांताधिकारी गजानन गुरव आदी उपस्थित होते.

मंदिराच्या बाजूने मोठे रुंदीकरण होणार असल्याची माहिती देताच उपस्थित नागरिक व्यापाऱ्यांनी मोठा गोंधळ सुरू केला. यावेळी नागरिकांनी आराखड्याविषयी सविस्तर माहितीच नसल्याचा मुद्दा मांडला. तसेच पंढरपूर हे प्राचीन शहर असल्यामुळे येथे वारकरी परंपरा असून सर्वसामान्यांची घरे पाडू नयेत अशी सूचना केली.

यावर सौरभ राव यांनी पुढील चार दिवस शहरातील विविध ठिकाणी सदर आराखडा माहितीस्तव पाहण्यास दिला जाणार असल्याचे जाहीर केले तसेच यावर सूचना कराव्यात असे आवाहन केले.

दरम्यान बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये सुजाता सैनिक यांनी, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते महाद्वार घाट असा कॉरिडॉर करण्याचा प्रस्ताव असल्याचे सांगितले.

यासाठी ७२ हजार वर्ग मीटर किंवा ४० हजार वर्ग मीटर अशी जमीन संपादित करण्याचा प्रस्ताव आहे. श्री विठ्ठल मंदिराच्या डाव्या व उजव्या बाजूस साठ मीटर अर्थात २०० फूट भूसंपादनाचा देखील प्रस्ताव असल्याची माहिती दिली. मात्र प्रथम श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरातील सर्व महत्त्वाची कामे पूर्ण केल्यानंतर बाहेरील विकासाचा विचार करण्यात येईल असेही सौनिक यांनी जाहीर केले.

### ■ आराखडा नागरिकांसाठी खुला करणार

यावेळी उपस्थित महाराज मंडळी, स्थानिक नागरिक, व्यापाऱ्यांनी यास कडाडून विरोध दर्शविला. याची दखल घेऊन विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी सदर आराखडा चार दिवस नागरिकांना खुला करण्यात येणार असून यावर हरकती सूचना मांडाव्यात असे आवाहन केले.

# शहरातील मिळकत कर थकबाकीदारांसाठी विशेष अभय योजना

**थकबाकीवरील नोटीस- वॉरंट व शास्तीवर मिळणार ८० टक्के माफी**

✔ सुराज्य/सोलापूर

महापालिकेने आता विशेष अभय योजना जाहीर केली असून थकबाकीवरील नोटीस- वॉरंट व शास्तीवर ८० टक्के माफी राहणार आहे. नोव्हेंबर अखेर ही योजना संपताच डिसेंबरपासून युद्ध पातळीवर कारवाईची मोहीम हाती घेण्यात येणार असल्याचे महापालिका उपायुक्त विद्या पोळ यांनी सांगितले. सोलापूर शहर व हद्दवाढ भागातील सुमारे ५७२ कोटी रुपयांची मिळकत कराची असलेली थकबाकी वसूल करण्यासाठी ही विशेष अभय योजना दिनांक १२ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात येणार आहे. ती ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत असणार आहे. यानंतर पुन्हा थकबाकीदार मिळकतदारांना कोणत्याही प्रकारची संधी व योजना देण्यात येणार नाही.

**५७२ कोटी ५८ लाख थकबाकी :** सोलापूर शहरात सुमारे १ लाख तर हद्दवाढ भागात १ लाख ४० हजारावर मिळकती आहेत. यापैकी अनेक मिळकतींची जुनी ४६३ कोटी ६८ लाख ७१ हजार ९३६ आणि चालू आर्थिक वर्षातील आणखी १०८ कोटी ८९ लाख ३४ हजार २६१ रुपये असे एकूण ५७२ कोटी ५८ लाख ६ हजार २१७ रुपयांची थकबाकी आहे. ही वसुली करण्यासाठी प्रशासनाकडून मिळालेल्या निर्देशानुसार मालमत्ता कर विभागाकडून जोरदार कार्यवाही सुरू करण्यात आली. आता थकबाकी वसुलीसाठी यंदा लवकरच विशेष अभय योजना जाहीर करण्यात आली आहे. शहर व हद्दवाढ भागातील थकबाकी मिळकतदारांना या योजनेद्वारे त्यांची एकूण थकबाकी भरल्यास त्यांना मिळकत करात लावण्यात आलेली नोटीस फी, वॉरंट फी आणि शास्ती फीमध्ये तब्बल ८० टक्के रक्कम माफ करण्यात येणार आहे. ही योजना संपुष्टात आल्यानंतर जे मिळकतदार थकीत असतील अशा मिळकतदारांची थकबाकी वसूल करण्यासाठी जप्तीची मोहीम राबविण्यात येणार आहे.

अन्यथा थकबाकी वसूल, करण्यासाठी जप्तीची मोहीम, थकबाकी वसूल करण्यासाठी जप्तीची मोहीम यामध्ये मिळकती सील करणे, नळजोड तोडणे, जंगम मालमत्ता जप्त करणे, स्थावर मालमत्तेचे लिलाव करून थकबाकीची रक्कम वसूल करण्यात येणार आहे. ही कटू कारवाई टाळून थकबाकी मिळकतदारांनी विशेष अभय योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान, मागील थकबाकी वसूल व्हावी यासाठी थकबाकीदार मिळकतदारांची प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालतमध्ये ठेवण्यात आली आहेत.

# सांगोला सूतगिरणीच्या अध्यक्षपदी डॉ.माळी

✔ सुराज्य/सोलापूर



शेतकरी कामगार पक्षाचे नेते दिवंगत माजी आमदार गणपतराव देशमुख यांच्या निधनानंतर पहिल्याच झालेल्या शेतकरी सहकारी सूतगिरणीच्या निवडणुकीत सर्वांनी एकत्रित येत बिनविरोध केली. संचालकांच्या बिनविरोध निवडीनंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष कोणाची निवड होणार याकडे लक्ष लागले होते. अध्यक्षपदी डॉ. प्रभाकर माळी यांची निवड करण्यात आली.

या अगोदर गेले काही वर्षे अध्यक्षपदी राहिलेले नानासाहेब लिगाडे यांनी निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे यावर्षी अध्यक्षनिवडीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. बिनविरोध झालेल्या संचालकांमध्ये माजी आमदार गणपतराव देशमुख यांचे पुत्र चंद्रकांत देशमुख व आण्णासाहेब देशमुख या दोघांची वर्णी लागल्यामुळे दोघांपैकी एकाच अध्यक्षपदाची संधी मिळेल असे वाटत होते. मात्र, अचानकपणे सांगोला अर्बन बँकेचे अध्यक्ष असलेले डॉ. प्रभाकर माळी यांची वर्णी लागल्यामुळे सगळ्यांच्याच भुवया उंचावल्या आहेत. तर उपाध्यक्षपदी अ‍ॅड. नितीन गव्हाणे यांची निवड झाली आहे.यावेळी नूतन अध्यक्ष डॉ. प्रभाकर माळी यांचा सत्कार माजी अध्यक्ष नानासाहेब लिगाडे यांच्या हस्ते तर ऍड. नितीन गव्हाणे यांचा चंद्रकांत देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# सायकलवरून पडल्याने इसमाचा मृत्यू

✔ **सांगोला** : माहीम (ता. सांगोला) येथे सायकल वरून पडल्याने उत्तम केरबा कांबळे (वय ५९) हे गंभीर जखमी होऊन उपचारा दरम्यान मरण पावले. मंगळवारी सायंकाळी ते गावातून सायकल वरून घराकडे निघाले होते. त्यावेळी खाली पडल्याने त्यांच्या डोक्यात मार लागला होता. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात आबासाहेब (मुलगा) यांनी दाखल केले होते. उपचारा दरम्यान ते बुधवारी रात्री मरण पावले.तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.




# राज्य साखर संघाच्या संचालकपदी अ‍ॅड.धनाजी साठे बिनविरोध



✔ **माढा** : महाराष्ट्र राज्य साखर संघाच्या संचालकपदी श्री संत कुर्मदास साखर कारखान्याचे चेअरमन तथा माजी आमदार अ‍ॅड. धनाजीराव साठे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

राज्यस्तरीय साखर संघावर प्रथमच संधी मिळाल्याने अ‍ॅड. साठे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. अ‍ॅड धनाजीराव साठे यांना राज्य साखर संघावर काँग्रेसच्या कोट्यातून संचालकपदी संधी मिळाली आहे.पहिल्यांदाच ही संधी मिळाली असून या माध्यमातून साखर कारखानदारी क्षेत्रात काम करण्यास यानिमित्ताने वाव मिळाला आहे. राज्य साखर संघाच्या २०२३-२६ या कालावधीसाठी ही निवड करण्यात आली असून एकूण २१ संचालकापैकी २० संचालक बिनविरोध झाले आहेत. अनुसूचित जाती जमातीचे संचालक पद रिक्त राहिले आहे. सदर निवडी या निवडणूक निर्णय अधिकारी जे डी पाटील यांनी जाहीर केले आहे.

### जिल्ह्यातून चार जणांना संधी

विद्यमान आमदार बबनराव शिंदे यांची साखर संघावर बिनविरोध निवड झाली. याचवेळी करमाळ्याच्या रश्मी बागल, पंढरपूरचे कल्याणराव काळे यांचीही बिनविरोध निवड झाल्याने राज्य संघावर जिल्ह्यातून चार प्रतिनिधी निवडले गेले आहेत.

# कृषिमंत्री अब्दुल सत्तारांचा मंत्रिपदाचा राजीनामा घ्या

## गुन्हा दाखल करण्यासाठी राष्ट्रवादी आक्रमक; जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ आंदोलन

✔ सुराज्य/सोलापूर




राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी च्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याबाबत वादग्रस्त विधान केल्याने त्यांच्या विरोधारात राष्ट्रवादी अक्रमक झाली आहे सत्तार यांचा मंत्रीपदाचा राजीनाम घेऊन फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी जिल्हाराष्ट्रवादीच्या वतीने जिल्हा अधिकारी कार्यलया समोर अंदोलन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

वाचाळ अब्दुल सत्तार यांनी वादग्रस्त विधान केल्याने तमाम राज्यातील जनतेच्या भावना तरः दुखावल्या गेल्या आहेत. या शिवाय महाराष्ट्रातील तमाम महिला वर्गाचा अपमान झाला आहे महाअघाडीच सरकार असताना असे प्रकार कधी घडले नाहीत मात्र खोके आणि बिन डोक्याचे सरकार आल्यानंतर शिंदे - फडणवीस सरकार मधिल मंत्री वाचाळ झाले आहे. राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात केलेल्या वक्तव्याचे पडसाद संपूर्ण राज्यात उमटले आहेत. रराज्यभरात सत्तार यांच्या विरोधात निदर्शने सुरू आहेत. सोलापूरात देखिल जिल्हाराष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ धरणे आंदोलन करत निषेध केला.

आंदोलनात बाजार समितीचे संचालक जितेंद्र साठे महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सुवर्णा शिवपूजे, जिल्हा कार्याध्यक्ष सुवर्णा झाडे जिल्हा उपाध्यक्ष महेश माने, प्रदेशचे लतीफ तांबोळी, भाऊ लामकाने, मनोज साठे यांच्यासह, रवी होनराव संगमेश बगले, मनोज साठे ,धनाजी भोसले, पाटील बंदेनावाज, सुवर्णा शिवपुरे, सुनील भोसले, सुनील गोरे, दीपक अंधारे, नाशिर जागीरदार, अरविंद कांबळे इत्यादी उपस्थित होते.

### ...अन्यथा राष्ट्रवादी आणखी आक्रमक होईल : साठे

सुप्रिया सुळे या संसदरत्न आहेत त्यांच्यावरील टिका कदापि खपवून घेतली जाणार नाही, अशा वाचाळखोर मंत्र्याचा राजीनामा द्यावा अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस अधिक आक्रमक होईल, असे काका साठे यांनी सांगितले.

**- बळीरामकाका साठे**

# मैदानांसह टेबल टेनिस हॉल भाडे आकारणी प्रकरणी बैठक

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर श्र व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो मैदानांसह टेबल टेनिस हॉलसाठी भाडे आकारणीचा प्रस्ताव सोलापूर महापालिकेच्या स्टेडियम समिती समोर आहे. शुक्रवारी ११ रोजी दुपारी १२ वाजता बैठक आहे. त्यासाठी गुरुवारी महापालिका प्रशासनाकडून चर्चा करण्याबाबत निरोप मिळाल्यानंतर सोलापूर जिल्हा क्रिडा महासंघ, जिल्हा व्हॉलिबॉल, कबड्डी व खो खो संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी चर्चा केली. चर्चेत जिल्हा क्रिडा महासंघासह सर्वच क्रिडा संघटनांनी यास तीव्र विरोध केला. तरी नाममात्र भाडे आकारणी असावी, याबाबतही चर्चा झाली. तुमचे म्हणणे उद्याच्या बैठकीत मांडतो असे त्यांनी सर्वांना सांगितले.

यावेळी जिल्हा क्रीडा महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. पूरणचंद्र पुंजाल, सरचिटणीस महेश गादेकर, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे, विविध जिल्हा क्रीडा संघटनेचे प्रा. बाळासाहेब भास्कर, मिलिंद गोरटे, अनिल यरगल (व्हॉलिबॉल), प्रिया पवार, सुनील चव्हाण, संतोष कदम (खो खो), स्वाती पुंजाल, संतोष जाधव (कबड्डी), किरण चौगुले (फुटबॉल) आदी उपस्थित होते.

# मैंदर्गीत आजपासून अभिनव गवी सिद्धेश्वर महास्वामीजींचे आध्यात्मिक प्रवचन

✔ **अक्कलकोट** : तालुक्यातील मैंदर्गी येथे आज शुक्रवार दि ११ नोव्हेंबर पासून दररोज सायंकाळी सहा ते साडेसात वाजेपर्यंत शिवचलेश्वर देवस्थान समोरच्या मैदानावर कोप्पळ जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय प्रवचनकार म.नि. प्र. अभिनव गवी सिध्देश्वर महास्वामीजी यांचे आध्यात्मिक प्रवचन कार्यक्रमास सुरुवात होत असून, हा कार्यक्रम २० नोव्हेंबर २०२२ पर्यंत चालणार आहे. मैंदर्गी शहरातील प्रत्येक समाज बांधवासहित जवळपास एक हजार युवक ड्रेस कोड सह एकत्रित येऊन दहा दिवसाचे प्रवचन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी नऊ विविध समित्या गठीत करून प्रवचन कार्यक्रमाचे तयारी पूर्णपणे करत योग्य नियोजन करण्यात आले आहे.



याची गुरुवारी दुपारी नियोजन समितीचे सर्व पदाधिकार्यांनी पाहणी केली आहे. हा प्रवचन कार्यक्रम दररोज सायंकाळी सहा ते साडेसात वाजेपर्यंत जवळपास दहा दिवस चालणार असून, त्या दरम्यान दररोज सकाळी ०६.३० ते ८ वाजेपर्यंत मैंदर्गी परिसरातील जवळपास सात गावात प्रभात फेरी निघणार आहे. यात दुधनी, संगोळगी (ब), मादनहिप्परगा, बोरी उमरगे, सलगर, हतीकणबस, उडगीसह पादयात्रा निघणार आहे.या पदयात्रेत विविध मठाचे जवळपास तीस ते चाळीस महास्वामीजीं उपस्थित राहणार आहेत. महास्वामीजींचे प्रवचन ऐकण्यासाठी महाराष्ट्र व कर्नाटकातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.या प्रवचना करिता ड्रेस कोडसह जवळपास एक हजार हून अधिक स्वयंसेवक नेमण्यात आले आहेत व प्रवचन कार्यक्रमाचे स्थळासमोरील गेट समोर जागोजागी रांगोळी, पंचवीस शालेय विद्यार्थी स्वागतासाठी सज्ज असून, जवळपास पाच एकर जागेत दहा हजार भाविक बसतील अशा मोठ्या प्रमाणात बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळी बैठक व्यवस्था करण्यात आली असून,यात पाणी पुरवठा समिती, पार्किंग समिती,पादयात्रा,भजना मंडळ समिती, इलेक्ट्रिक, शौचालय समिती,अतिथी समिती असे जवळजवळ एकूण नऊ समिती गठीत करण्यात आली आहे. मैंदर्गी शहर, तालुक्यातील व कर्नाटकातील प्रत्येक भाविक, नागरिकांनी सहकार्य करावे आणि या अध्यात्मिक प्रवचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन नियोजन समितीने केले. मंडप व्यवस्था गंगाराम चव्हाण व त्यांचे सहकारी यांनी केले आहे. पाहणीवेळी नियोजन समितीचे प्रमुख संगप्पा गडगी, ज्येष्ठ माजी नगराध्यक्ष तुकप्पा नागूर,ज्येष्ठ नागरिक राजशेखर मसुती, समाजसेवक, उद्योजक सुरेश नागूर, शिवचलप्पा मुन्नोळी, किरण केसुर, किरण पाटील, प्रगतशील शेतकरी सुरेखा होळीकट्टी, ज्येष्ठ काशिनाथ जकापुरे, सिद्धाराम पाटील, प्रभूदेव बेनिसुर, दयानंद बमनळ्ळी, संजयराज मोरे, सिद्धाराम जकापुरे, योगीराज बाजार मठ, शिवशरण भरमा, लक्ष्मीपुत्र निंबाळ,चंद्रकांत करजगी उपस्थित होते.

# सार्वजनिक नळाच्या समर्थनार्थ सुरेश पाटील रस्त्यावर

## तात्काळ नळ न जोडल्यास आंदोलनाचा इशारा

✔ **सोलापूर** : सार्वजनिक नळाच्या समर्थनार्थ माजी नगरसेवक सुरेश पाटील रस्त्यावर उतरले आहेत. सार्वजनिक नळ तोडण्याच्या प्रशासनाच्या निर्णयावर प्रहार करत तत्काळ सार्वजनिक नळ जोडा, अन्यथा रस्त्यावर उतरू असा इशारा त्यांनी दिला आहे. शहरात कामगार, कष्टकरी, गोरगरीब, हातावर पोट असलेले मध्यमवर्गीय नागरिक राहतात आणि त्यांची तहान ही सार्वजनिक नळावरच्या पाण्यावरच भागते. हे नळ बंद केल्याने पाण्यासाठी त्यांना भटकंती करावी लागणार आहे.



त्यामुळे सुरेश पाटील यांनी प्रशासनाच्या कारभारावर संताप व्यक्त केला. सोलापूर शहरामध्ये ४९ हजाराहून अधिक बेकायदेशीर नळ आहेत. ते नळ बंद न करता सर्वसामान्य जनतेसाठी आधार वाटणाऱ्या नळावर प्रशासनाचा डोळा का? हे नळ पुन्हा कार्यान्वित करून गरीब जनतेची तहान भागवा अन्यथा प्रशासनाच्या या निर्णयाविरोधात आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला. आयुक्तांची ही भूमिका चुकीची असून आयुक्तांनी हा निर्णय कायम ठेवल्यास त्यांना परत पाठवण्यासाठी मोठी चळवळ उभी करण्याचा इशाराही सुरेश पाटील यांनी दिला. जनहित पाहणाऱ्या लोकप्रतिनिधींनी यात सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

### पदाधिकाऱ्यांचे बेकायदेशीर नळ पूर्ववत का?

स्मार्ट सिटीमध्ये हा निर्णय योग्य असला तरी कामगार आणि गरीब वसाहतीमध्ये सार्वजनिक नळाची गरज आहे. काही माजी महापौर, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचाऱ्यांचे बेकायदेशीर नळ कायदेशीर करून पूर्वत का करून देण्यात आले, असा प्रश्नही सुरेश पाटील यांनी उपस्थित केला.